| धाराशिव | वर्ष २६ वे | अंक ८० वा | रविवार दिनांक ३१ मे, २०२६ | पृष्ठे ६ | किंमत ०१ ₹ RNI MAHMAR/2003/11649

# लातूर समाचार

(सांज दैनिक)
प्रकाशन: धाराशिव (उस्मानाबाद आवृत्ती)
पोष्ट परवाना L2/RNP/OMD- 52/24-26

dainiklatursamachar@gmail.com
संस्थापक : स्व. शंकर माधव जडे (स्वातंत्र्य सैनिक)

## ॲट्रॉसिटी प्रकरणांचा जलद गतीने निपटारा करा : जिल्हाधिकारी श्री.पूजार यांचे संबंधित यंत्रणांना निर्देश



धाराशिव,दि.२९ मे (जिमाका) अनुसूचित जाती व जमाती अत्याचार प्रतिबंध अधिनियम १९८९ अंतर्गत दाखल झालेल्या प्रलंबित प्रकरणांचा जलदगतीने निपटारा करण्यात यावा,अशा स्पष्ट सूचना जिल्हाधिकारी किर्ती किरण पूजार यांनी संबंधित यंत्रणांना दिल्या. जिल्हा दक्षता व नियंत्रण समितीची बैठक २९ मे रोजी जिल्हाधिकारी कीर्ती किरण पुजार यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाली.

या बैठकीस जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी श्रीमती. प्रियंवदा म्हाडदळकर,समाज कल्याणचे सहाय्यक आयुक्त सचिन कवले तसेच समितीचे सर्व सदस्य उपस्थित होते.

बैठकीत मार्च २०२६ अखेर घेण्यात आलेल्या मागील बैठकीच्या इतिवृत्तास मान्यता देण्यात आली. यावेळी अनुसूचित जाती-जमाती अत्याचार प्रतिबंधक कायद्यांतर्गत प्रलंबित प्रकरणांचा सविस्तर आढावा घेण्यात आला. मार्च २०२६ अखेर पोलीस तपासावर प्रलंबित असलेल्या २१ प्रकरणांपैकी आठ प्रकरणांत दोषारोपपत्र दाखल करण्यात आले असून एका प्रकरणाचा निपटारा करण्यात आला आहे.अद्याप १२ प्रकरणे प्रलंबित असून २७ मे अखेर आणखी चार प्रकरणांत दोषारोप अहवाल दाखल झाल्याची माहिती जिल्हा दक्षता व नियंत्रण समितीच्या सदस्य सचिवांनी दिली.

सद्यस्थितीत एप्रिल २०२६ अखेर एकूण २६ प्रकरणे तपासावर प्रलंबित आहेत.त्यापैकी २४ प्रकरणे ही ६० दिवसांच्या आतील असून दोन प्रकरणे ६० दिवसांपेक्षा अधिक कालावधीपासून प्रलंबित असल्याचेही बैठकीत सांगण्यात आले. यावेळी जिल्हाधिकारी श्री.पुजार यांनी संबंधित विभागांनी प्रकरणांच्या तपासात गती आणून पीडितांना वेळेत न्याय मिळवून देण्यासाठी आवश्यक कार्यवाही तत्परतेने करण्याचे निर्देश दिले.

## आचारसंहितेमुळे जिल्हास्तरीय लोकशाही दिनाला स्थगिती

धाराशिव (जिमाका) उस्मानाबाद-लातूर-बीड महाराष्ट्र विधानपरिषदेच्या स्थानिक प्राधिकारी मतदारसंघाच्या द्विवार्षिक निवडणूक -२०२६ साठी लागू करण्यात आलेल्या आदर्श आचारसंहितेच्या कालावधीत जिल्हास्तरीय लोकशाही दिनाचे आयोजन करण्यात येणार नसल्याचे प्रशासनाने स्पष्ट केले आहे. जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली दर महिन्याच्या पहिल्या सोमवारी जिल्हास्तरावर लोकशाही दिनाचे आयोजन करण्यात येते.मात्र,महाराष्ट्र राज्य निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार उस्मानाबाद-लातूर-बीड महाराष्ट्र विधानपरिषदेच्या स्थानिक प्राधिकारी मतदारसंघाच्या द्विवार्षिक निवडणूक - २०२६ साठी आदर्श आचारसंहिता लागू करण्यात आली आहे. निवडणूक आयोगाच्या पत्रानुसार ही आचारसंहिता निवडणूक प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत,म्हणजेच २५ जून २०२६ पर्यंत लागू राहणार आहे.त्यामुळे निवडणुकीचे वेळापत्रक जाहीर झाल्यापासून ते संपूर्ण निवडणूक प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत जिल्हाधिकारी कार्यालयात दर महिन्याच्या पहिल्या सोमवारी आयोजित करण्यात येणारा जिल्हास्तरीय लोकशाही दिन आयोजित करण्यात येणार नाही. आचारसंहिता कालावधी संपल्यानंतर लोकशाही दिनाचे आयोजन पूर्ववत करण्यात येणार आहे.

## २०१ कारवाया करुन १,७९,८०० 'तडजोड शुल्क'वसुल

धाराशिव (प्रतिनिधी)- धाराशिव शहर वाहतुक शाखा व संबंधीत पोलीस ठाण्यांनी महत्त्वाच्या रस्त्यांवर दि.२९ में रोजी मोटार वाहन कायदा-नियम भंग प्रकरणी एकुण २०१ कारवाया करुन १,७९,८०० 'तडजोड शुल्क'वसुल केले आहे.

## क्राईम न्युज

### प्राण्यांना निर्दयपणे वागणुक देवून वाहतुक करणाऱ्यावर गुन्हा दाखल

धाराशिव (प्रतिनिधी)- धाराशिव शहर पोलीस ठाणे अंतर्गत पोलिसाकडून समजलेली माहिती अशी की, साहिल, वय २६ वर्षे, रा. एमके हॉलचे पाठीमागे धाराशिव ता. जि. धाराशिव यांनी दि. २८.०५.२०२६ रोजी नागनाथ रोड धाराशिव येथे पिकअप क्र एमएच २४ एयु ५२९२ मध्ये चार जर्शी गायी व २ वासरे एकुण ८६,००० वाहनसह २,८६,००० किंमतीचे गोवंशीय जनावरांची चारा पाण्याची व्यवस्था न करता निर्दयतेने कत्तलीसाठी बेकायदेशीर रित्या वाहतुक करत असताना धाराशिव शहर पोलीस ठाण्याचे पथकास मिळून आला. यावरुन पोलीसांनी सरकारतर्फे नमूद व्यक्तींविरुध्द प्राण्यास क्रुरतेने वागण्यास प्रतिबंध अधिनियम कलम ११(१) (ब) सह कलम ५(अ), महाराष्ट्र प्राणी संरक्षण अधिनियम सह कलम ११९ मपोका अन्वये गुन्हा नोंदवला आहे.


तसेच शिराढोण पोलीस ठाणे अंतर्गत मंजुर , वय ४० वर्षे, आयुब, वय ६८ वर्षे, खयुम, वय ४० वर्षे, सिकंदर, वय ५२ वर्ष, सिद्दीक, वय ३५ वर्षे, मुक्तार, वय ४८ वर्षे, युनुस पाशा कुरेशी, वय ३२ वर्षे, मुस्तफा उर्फ बबलु, वय २० वर्षे, रा. शिराढोण ता. कळंब जि. धाराशिव यांनी दि.२९.०५.२०२६ रोजी शेतगट नं २४९ माधील मंजुर उस्मान याचे शेतातील गोठ्याचे बाजूस पत्राचे आडोशाला शिराढोण शिवार येथे पाच गोवंशीय बैल व कत्तलीसाठी लाणारे साहित्य असे एकुण ८,६१,१५० किंमतीचे गोवंशीय जनावरांची चारा पाण्याची व्यवस्था न करता निर्दयतेने कत्तलीसाठी बेकायदेशीर रित्या बांधुन ठेवून असताना शिराढोण पोलीस ठाण्याचे पथकास मिळून आले. यावरुन पोलीसांनी सरकारतर्फे नमूद व्यक्तींविरुध्द प्राण्यास क्रुरतेने वागण्यास प्रतिबंध अधिनियम कलम ११(१) (ज) सह कलम ५(ब)(क), महाराष्ट्र प्राणी संरक्षण अधिनियम अन्वये गुन्हा नोंदवला आहे. पोलिस अधिक तपास करीत आहेत.

### शस्त्र कायद्यांतर्गत गुन्हा नोंद

धाराशिव (प्रतिनिधी)- येरमाळा पोलीस ठाणे अंतर्गम दादाराव , वय ३२ वर्षे, रा. बावी पारधी पिढी ता. वाशी जि. धाराशिव यांनी दि.२८.०५.२०२६ रोजी ०१.०० वा. सु.बावी शिवारातील आपल्या राहत्या घरामध्ये लोकांच्या जिवीतास धोका निर्माण होईल असे एक तलवार अंदाजे ५०० किंमतीची ही विनापरवाना बेकायदेशीर रित्या स्वत:चे जवळ बाळगलेला येरमाळा पोलींसाना मिळून आला. यावर पथकाने नमुद तलवार जप्त करुन फिर्यादी नामे-स्वप्नील भोजगुडे पोलीस उप निरीक्षक नेमणुक पोलीस ठाणे येरमाळा यांनी दिलेल्या प्रथम खबरेवरुन शस्त्र कायदा कलम- ४,२५ सह१३५ महा पोलीस अधिनियम अन्वये येरमाळा पो. ठाणे येथे गुन्हा नोंदवला आहे.

### शेतीचे मशागतीचे कारणावरुन मारहाण

येरमाळा (प्रतिनिधी)- पोलीस ठाणे अंतर्गत उत्रेश्वर इटकुर येथील तीन अनोळखी नातेवाईक यांनी दि.२१.०५.२०२६ रोजी बावी शिवारातील शेत गट नं ६४९ मध्ये फिर्यादी नामे-ज्ञानदेव सुखदेव शिंदे, वय ७५ वर्षे, रा. बावी ता. वाशी जि. धाराशिव यांना त्यांचे पुतणे विजयसिंह शिंदे व भावजई सुकन्या यांना नमुद व्यक्तीने शेतीचे मशागतीचे कारणावरुन शिवीगाळ करुन लाथाबुक्यांनी, काठीने मारहाण करुन गंभीर जखमी केले. जिवे ठार मारण्याची धमकी दिली. अशा मजकुराच्या फिर्यादी ज्ञानदेव शिंदे यांनी दि.२८.०५.२०२६ रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरुन पो ठाणे येरमाळा येथे भा.न्या.सं.कलम ११७(२), ११८(१), ११५(२), ३५२, ३५१(२), ३(५) अन्वये गुन्हा नोंदवला आहे.



ओ३म् भूर्भुवः स्वः ।
तत्सवितुर्वरेण्यं भर्गो देवस्य धीमहि ।
धियो यो नः प्रचोदयात् ॥

# लातूर समाचार

## अशा प्रयोगाची गरज आहे

विद्यार्थ्यांना कठिण वाटणारी बायोमेट्रिक हजेरी प्रणाली विद्यार्थ्यांना वर्गात आणू शकते; पण ती शिक्षणात गुणवत्ता निर्माण करू शकते का? हा मूलभूत प्रश्न आहे. फक्त बोटांचे ठसे घेऊन शिक्षण सुधारणार असेल, तर शिक्षणातील अनेक गंभीर समस्या तांत्रिक साधनांनी सहज सुटल्या असत्या. महाराष्ट्रातील सर्व कनिष्ठ महाविद्यालयांमध्ये विद्यार्थ्यांसाठी बायोमेट्रिक उपस्थिती प्रणाली लागू करण्याचा राज्य सरकारचा प्रस्ताव सध्या चर्चेचा विषय ठरला आहे. तब्बल १०० कोटी रुपयांचा हा प्रकल्प राज्यातील सुमारे ९,५०० कनिष्ठ महाविद्यालयांमध्ये राबविण्याचा विचार सुरू आहे. विद्यार्थ्यांची ७५ टक्के उपस्थिती सुनिश्चित करणे, कोचिंग क्लासेसचे वाढते जाळे रोखणे, शिक्षणातील गैरप्रकारांवर नियंत्रण आणणे आणि नीट पेपरफुटीसारख्या घटनांनंतर निर्माण झालेला अविश्वास कमी करणे हे या निर्णयामागील प्रमुख उद्दिष्ट असल्याचे सरकारचे म्हणणे आहे. मात्र, या प्रस्तावाकडे केवळ शिस्तीचे साधन म्हणून पाहणे पुरेसे नाही; तर शिक्षणव्यवस्था, विद्यार्थ्यांचे वास्तव, खासगी कोचिंग संस्कृती, ग्रामीण-शहरी दरी, डिजिटल देखरेख आणि शिक्षणातील व्यापारीकरण या सर्व प्रश्नांच्या संदर्भात या निर्णयाचे मूल्यमापन करणे आवश्यक आहे. गेल्या काही वर्षांत शिक्षणक्षेत्रात 'हजेरी' हा फक्त प्रशासनाचा विषय राहिलेला नाही, तर तो बाजारव्यवस्थेशी जोडला गेला आहे. विशेषतः बारावी विज्ञान शाखेतील विद्यार्थी मोठ्या प्रमाणात महाविद्यालयापेक्षा कोचिंग क्लासेसकडे वळले. नीट, जेईई, सीईटी यांसारख्या स्पर्धा परीक्षांच्या वाढत्या दडपणामुळे अनेक विद्यार्थी केवळ नावापुरते कॉलेजमध्ये प्रवेश घेतात आणि प्रत्यक्ष वेळ कोचिंग क्लासेसमध्ये घालवतात. त्यामुळे महाविद्यालये रिकामी दिसू लागली आणि शिक्षणाची मूळ प्रक्रिया दुय्यम ठरली. या पार्श्वभूमीवर सरकारला बायोमेट्रिक हजेरी हा उपाय वाटू लागला आहे. मात्र प्रश्न असा आहे की, विद्यार्थ्यांची अनुपस्थिती ही केवळ शिस्तभंग आहे का? की त्यामागे शिक्षणव्यवस्थेतील खोलवरचे दोष आहेत? जर कनिष्ठ महाविद्यालयातील अध्यापन दर्जेदार, स्पर्धा परीक्षांशी सुसंगत आणि रोजगाराभिमुख असते, तर विद्यार्थी क्लासेसकडे एवढ्या मोठ्या प्रमाणावर वळले असते का? आज अनेक पालकांना असे वाटते की महाविद्यालयातील शिक्षण पुरेसे नाही. त्यामुळे ते लाखो रुपये खर्च करून खासगी कोचिंगचा पर्याय स्वीकारतात. याचा अर्थ विद्यार्थ्यांची अनुपस्थिती ही केवळ विद्यार्थ्यांची चूक नसून शिक्षणव्यवस्थेवरील अविश्वासाचे लक्षण आहे. शिक्षण ही सामाजिक, मानसिक आणि सांस्कृतिक प्रक्रिया आहे. विद्यार्थ्यांच्या शिकण्याच्या प्रेरणा, शिक्षकांचे अध्यापन कौशल्य, पालकांचा दबाव, स्पर्धात्मक वातावरण आणि रोजगाराच्या असुरक्षितता या घटकांमुळे शिक्षणाचे वास्तव आकार घेत असते. या निर्णयाचा आणखी एक महत्त्वाचा पैलू म्हणजे नजर ठेवणारे राज्य ही संकल्पना. आज जगभरात डिजिटल तंत्रज्ञानाच्या माध्यमातून नागरिकांवर नियंत्रण ठेवण्याची प्रवृत्ती वाढत आहे. शाळा, महाविद्यालये, कार्यालये, सार्वजनिक ठिकाणे सर्वत्र सीसीटीव्ही, बायोमेट्रिक डेटा आणि डिजिटल ट्रॅकिंग यांचा वापर वाढत आहे. विद्यार्थ्यांच्या उपस्थितीचे डिजिटल निरीक्षण हे शिस्तीच्या नावाखाली वैयक्तिक स्वातंत्र्यावर अतिक्रमण ठरू शकते. विद्यार्थ्यांचा बायोमेट्रिक डेटा किती सुरक्षित राहील? त्याचा वापर कोण करणार? भविष्यात त्याचा गैरवापर होणार नाही याची हमी कोण देणार? हे प्रश्न दुर्लक्षित करता येणार नाहीत. विशेषतः ग्रामीण आणि आदिवासी भागातील विद्यार्थ्यांसाठी हा निर्णय अधिक गुंतागुंतीचा ठरू शकतो. अनेक विद्यार्थी दररोज लांब अंतर प्रवास करून महाविद्यालयात येतात. वाहतूक समस्या, आर्थिक अडचणी, कौटुंबिक जबाबदार्‍या, शेतीकाम किंवा घरकाम यामुळे नियमित उपस्थिती राखणे त्यांच्यासाठी कठीण ठरते. मुलींच्या बाबतीत तर सुरक्षेचे प्रश्न, लवकर घरी पोहोचण्याचा दबाव आणि सामाजिक बंधने यामुळे शिक्षणातील सातत्य खंडित होते. अशा परिस्थितीत बायोमेट्रिक उपस्थितीची कठोर अट सामाजिक विषमता अधिक तीव्र करू शकते. शिक्षणातील सामाजिक वास्तव समजून घेतल्याशिवाय केवळ तांत्रिक उपायांवर भर देणे धोकादायक ठरू शकते. समाजशास्त्रज्ञ मिशेल फुको यांनी 'शिस्तबद्ध समाज' ही संकल्पना मांडताना सांगितले होते की आधुनिक संस्था व्यक्तींवर सतत देखरेख ठेवून त्यांना नियंत्रित करतात. बायोमेट्रिक उपस्थिती हा त्याच प्रक्रियेचा भाग मानला जाऊ शकतो. विद्यार्थ्यांना शिकणारे नागरिक म्हणून नव्हे, तर नियंत्रित करावयाचे घटक म्हणून पाहण्याची मानसिकता शिक्षणव्यवस्थेसाठी घातक आहे. याचबरोबर या निर्णयामागे शिक्षणाचे व्यापारीकरण हा मोठा मुद्दा दडलेला आहे. अनेक कनिष्ठ महाविद्यालये प्रत्यक्षात कोचिंग क्लासेसशी संलग्न असल्याच्या तक्रारी सातत्याने होत आहेत. काही महाविद्यालये केवळ उपस्थिती आणि परीक्षेच्या सोयीसाठी अस्तित्वात आहेत. अशा परिस्थितीत सरकारने फक्त विद्यार्थ्यांवर नियंत्रण ठेवण्याऐवजी शिक्षणसंस्थांच्या कार्यपद्धतीची कठोर चौकशी करणे अधिक आवश्यक आहे. जे महाविद्यालय प्रत्यक्ष अध्यापन करत नाहीत, विद्यार्थ्यांना फक्त नावापुरते प्रवेश देतात किंवा क्लासेसशी आर्थिक संबंध ठेवतात, त्यांच्यावर कारवाई होणे गरजेचे आहे. नीट पेपरफुटीसारख्या घटनांनी शिक्षणव्यवस्थेवरील विश्वास हादरला आहे. अशा घटनांमुळे विद्यार्थ्यांमध्ये असुरक्षितता आणि पालकांमध्ये भीती वाढते. पण पेपरफुटीचे मूळ कारण विद्यार्थ्यांची अनुपस्थिती नसून शिक्षणातील भ्रष्टाचार, परीक्षा व्यवस्थेतील त्रुटी आणि आर्थिक स्वार्थ हे आहेत. त्यामुळे बायोमेट्रिक हजेरी हा फक्त वरवरचा उपाय ठरू शकतो. मूळ समस्यांवर प्रहार न करता फक्त नियंत्रण वाढवणे म्हणजे आजाराचे कारण न शोधता ताप कमी करण्यासारखे आहे. सरकारला जर खरोखरच विद्यार्थ्यांची हजेरी वाढवायची असेल, तर त्यासाठी केवळ बायोमेट्रिक मशीन पुरेसे नाहीत. महाविद्यालयांमधील अध्यापनाची गुणवत्ता वाढवणे, प्रयोगशाळा व ग्रंथालये सक्षम करणे, शिक्षकांची रिक्त पदे भरणे, करिअर मार्गदर्शन उपलब्ध करून देणे आणि स्पर्धा परीक्षांसाठी महाविद्यालयीन स्तरावर सक्षम व्यवस्था निर्माण करणे अधिक महत्त्वाचे आहे. विद्यार्थ्यांना महाविद्यालयात यावेसे वाटले पाहिजे; केवळ मशीनसमोर अंगठा लावण्यासाठी नव्हे. आजच्या काळात शिक्षण हे केवळ प्रमाणपत्र मिळविण्याचे साधन राहिले नाही; ते सामाजिक गतिशीलता, आर्थिक सुरक्षितता आणि व्यक्तिमत्त्व विकासाचे माध्यम आहे. त्यामुळे शिक्षणव्यवस्थेकडे विश्वास आणि सहभाग या दृष्टिकोनातून पाहणे आवश्यक आहे. विद्यार्थ्यांना वर्गात आणण्यासाठी नियंत्रण महत्त्वाचे की प्रेरणा? शिक्षणाला मानवी चेहरा द्यायचा की डिजिटल निरीक्षणाचे केंद्र बनवायचे? महाराष्ट्रासारख्या प्रगत राज्याने या प्रश्नांचा गांभीर्याने विचार करण्याची गरज आहे.


# महाराष्ट्राची लोकमाता : पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर

महाराष्ट्राच्या इतिहासाला अनेक थोर संत, समाजसुधारक आणि आदर्श राज्यकर्त्यांचा गौरवशाली वारसा लाभला आहे. त्या तेजस्वी परंपरेतील एक अद्वितीय आणि प्रेरणादायी व्यक्तिमत्त्व म्हणजे पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर. लोककल्याण, न्यायप्रियता, धर्मपरायणता आणि सक्षम प्रशासन यांचा सुंदर मिलाफ त्यांच्या व्यक्तिमत्त्वात दिसून येतो. म्हणूनच इतिहासाने त्यांना 'लोकमाता' आणि 'पुण्यश्लोक' ही उपाधी बहाल केली.

अहिल्यादेवी होळकर यांचा जन्म ३१ मे १७२५ रोजी महाराष्ट्रातील चौंडी या गावात झाला. त्यांचे वडील माणकोजी शिंदे हे गावचे पाटील होते. त्या काळात मुलींना शिक्षण देण्याची प्रथा फारशी नव्हती; परंतु माणकोजी शिंदे यांनी अहिल्यादेवींना धार्मिक, नैतिक आणि व्यवहारज्ञानाचे शिक्षण दिले. बालपणापासूनच त्यांच्यामध्ये करुणा, परोपकार आणि नेतृत्वगुण दिसून येत होते. असे सांगितले जाते की, मराठा साम्राज्याचे पराक्रमी सरदार मल्हारराव होळकर यांनी एका मंदिरात लहान अहिल्यादेवींना भक्तिभावाने पूजा करताना पाहिले आणि त्यांच्या गुणांनी प्रभावित होऊन आपल्या पुत्र खंडेराव होळकर यांच्याशी त्यांचा विवाह घडवून आणला. विवाहानंतर त्या माळवा प्रांतातील होळकर घराण्यात आल्या. त्यांचे वैवाहिक जीवन इंदूर आणि महेश्वर परिसरात गेले. अहिल्यादेवींच्या आयुष्यात अनेक कठीण प्रसंग आले. पती खंडेराव यांचे युद्धात निधन झाले. त्यानंतर सासरे मल्हारराव होळकर यांचेही निधन झाले. पुढे पुत्र मालेराव यांचाही मृत्यू झाला. या मोठ्या दुःखातून सावरत त्यांनी राज्यकारभाराची धुरा स्वतःच्या खांद्यावर घेतली. त्या काळात स्त्रीने राज्यसत्ता चालवणे हे अत्यंत कठीण मानले जात होते; परंतु अहिल्यादेवींनी आपली बुद्धिमत्ता, धैर्य आणि प्रशासनकौशल्याने संपूर्ण माळवा प्रदेश सक्षमपणे सांभाळला.

सन १७६७ ते १७९५ या काळात त्यांनी राज्यकारभार केला. त्यांची राजधानी महेश्वर येथे होती. त्यांच्या प्रशासनात प्रजेच्या कल्याणाला सर्वोच्च प्राधान्य होते. त्या दररोज जनतेच्या तक्रारी ऐकत आणि त्वरित न्याय देत. गरीब, शेतकरी, व्यापारी, स्त्रिया आणि दुर्बल घटकांच्या संरक्षणासाठी त्यांनी अनेक निर्णय घेतले.त्यांच्या न्यायप्रियतेविषयी अनेक कथा प्रसिद्ध आहेत. न्यायदान करताना त्यांनी कधीही पक्षपात केला नाही. स्वतःच्या नातलगांविरुद्धही त्यांनी न्यायाच्या तत्त्वांनुसार निर्णय दिले. त्यामुळे प्रजेमध्ये त्यांच्या विषयी अपार आदर निर्माण झाला. राज्यकर्त्याने प्रजेच्या सुखासाठी काम केले पाहिजे हा त्यांचा मूलमंत्र होता.

अहिल्यादेवींची ओळख केवळ एक सक्षम प्रशासक म्हणून नाही, तर लोककल्याणकारी आणि धर्मपरायण राज्यकर्ती म्हणूनही आहे. त्यांनी भारतभरातील अनेक मंदिरे, घाट, धर्मशाळा, विहिरी आणि यात्रेकरूंसाठी निवासस्थाने बांधली. उत्तर ते दक्षिण भारतापर्यंत त्यांच्या दानशूर कार्याचा ठसा दिसून येतो. लोकांना पिण्याचे पाणी, शेतीसाठी पाणी, यात्रेकरुंना पाणवठा




असा सर्वंकष विचार करुन त्यांनी विहिरी, बारवा, तलाव, कुंड, पाणपोया देशाच्या विविध भागात बांधल्या. ज्या काळात प्रदेशाप्रदेशात विभागणी होती त्या काळात 'बंधुता' पेरण्याचे काम तत्कालीन भारतात त्यांनी केले. त्यांनी काशी विश्वनाथ मंदिराच्या पुनर्बांधणीसाठी मोठे योगदान दिले. तसेच सोमनाथ, गया, उज्जैन, नाशिक, द्वारका, रामेश्वरम, अयोध्या आणि हरिद्वार यांसारख्या तीर्थक्षेत्रांमध्ये घाट, मंदिरे आणि धर्मशाळा उभारल्या. वाराणसीतील अनेक घाट आजही त्यांच्या कार्याची साक्ष देतात. राज्यात व्यापार आणि शेतीला चालना मिळाली. रस्ते, पाणीपुरवठा, बाजारपेठा आणि सुरक्षाव्यवस्था यावर त्यांनी विशेष भर दिला. त्यामुळे माळवा प्रदेश आर्थिकदृष्ट्या समृद्ध झाला. त्यांच्या प्रशासनात भ्रष्टाचाराला थारा नव्हता. अहिल्यादेवींचा करारीपणा आणि धाडसी नेतृत्व अनेक प्रसंगांत दिसून आले. युद्धजन्य परिस्थितीत त्यांनी स्वतः सैन्याचे नेतृत्व केले. शत्रूंना पराभूत करताना त्यांनी धैर्य आणि रणनीतीचे उत्कृष्ट उदाहरण घालून दिले. स्त्री नेतृत्वाविषयी असलेल्या समाजातील मर्यादित कल्पना त्यांनी आपल्या कार्यातून मोडून काढल्या.

भारतीय इतिहासात त्यांच्या समकालीन अनेक प्रभावी महिला होऊन गेल्या. परंतु लोककल्याणकारी राज्यव्यवस्था आणि धार्मिक-सामाजिक कार्य यांच्या समन्वयामुळे अहिल्यादेवींचे स्थान विशेष मानले जाते.

अहिल्यादेवींना पुण्यश्लोक ही उपाधी देण्यात आली कारण त्यांनी आपल्या प्रजेला दुःखातून मुक्त करुन सुखी करण्याचा प्रयत्न केला. लोकांच्या कल्याणासाठी आयुष्य अर्पण करणार्‍या राज्यकर्त्यालाच पुण्यश्लोक म्हटले जाते. त्यांच्या कार्यामुळेच त्या आजही लोकांच्या मनात लोकमाता म्हणून जिवंत आहेत.

महाराष्ट्र शासनानेही त्यांच्या कार्याचा गौरव विविध प्रकारे केला आहे. त्यांच्या २९८ व्या जयंतीनिमित्त अहमदनगर जिल्ह्याचे नामकरण अहिल्यानगर असे करण्यात आले. १३ मार्च २०२४ रोजी मंत्रिमंडळ बैठकीत हा निर्णय घेण्यात आला. त्यांच्या त्रिशताब्दी जन्मवर्षानिमित्त चोंडी येथे मंत्रिमंडळाची विशेष बैठक आयोजित करण्यात आली होती. चौंडी, तालुका जामखेड, जिल्हा अहिल्यानगर येथील पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर स्मृतीस्थळाच्या जतन संवर्धनासाठी कोट्यवधीचा निधी दिला आहे. केंद्र शासनाने त्यांच्या ३०० व्या जयंतीला विशेष डाक तिकीट काढले. राज्य शासनाने पुण्यश्लोक ३०० हा विशेष लोगो प्रकाशित केला आहे.

आज महाराष्ट्र शासन त्यांच्या आदर्श राज्यकारभाराच्या तत्त्वांनुसार सर्वसामान्यांच्या कल्याणासाठी विविध योजना राबवत आहे. महिलांचे सक्षमीकरण, उद्योग, शिक्षण आणि स्वावलंबन यासाठी अनेक उपक्रम सुरु करण्यात आले आहेत.

पुण्यश्लोकअहिल्यादेवीहोळकरमहिलास्टार्टअपयोजना– पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर महिला स्टार्टअप योजना ही महाराष्ट्रातील महिलांना उद्योग आणि उद्योजकतेसाठी प्रोत्साहन देणारी योजना आहे. या योजनेचा उद्देश महिलांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करणे, स्वयंरोजगाराच्या संधी उपलब्ध करुन देणे आणि नवीन व्यवसाय उभारण्यासाठी मदत करणे हा आहे. या योजनेअंतर्गत महिलांना: स्टार्टअप व्यवसायासाठी मार्गदर्शन, प्रशिक्षण व कौशल्यविकास, आर्थिक सहाय्य व कर्ज सुविधा, उद्योग उभारणीसाठी सल्ला, नवउद्योजकांना प्रोत्साहन अशा सुविधा उपलब्ध करुन दिल्या जातात. ग्रामीण आणि शहरी भागातील महिलांना आत्मनिर्भर बनविण्याचा या योजनेचा मुख्य हेतू आहे.

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांचे जीवन हे न्याय, सेवा, धर्मपरायणता आणि लोककल्याण यांचे प्रेरणादायी उदाहरण आहे. त्यांचा आदर्श राज्यकारभार आजही प्रशासनासाठी मार्गदर्शक मानला जातो. लोकहिताला सर्वोच्च प्राधान्य देणारी त्यांची विचारसरणी आजच्या काळातही तितकीच महत्त्वपूर्ण आणि प्रेरणादायी आहे.

**प्रवीण टाके,**
**उपसंचालक (माहिती)**
**विभागीय माहिती कार्यालय,कोल्हापूर**
**९७०२८५८७७७**

# अहिल्यादेवी होळकर : समाजकल्याणाची दीपस्तंभ

भारतीय इतिहासात अनेक पराक्रमी राजे, दूरदृष्टी असलेले प्रशासक आणि लोकहितासाठी आयुष्य अर्पण करणार्‍या व्यक्ती होऊन गेल्या; परंतु जनतेच्या मनावर मातृत्वाच्या भावनेने अधिराज्य गाजविणार्‍या व्यक्तिमत्त्वांमध्ये लोकमाता अहिल्यादेवी होळकर यांचे स्थान अत्यंत मानाचे आहे. ३१ मे हा दिवस त्यांच्या जयंतीदिनाच्या रूपाने संपूर्ण देशात आदराने साजरा केला जातो. मराठेशाहीच्या इतिहासात प्रशासन, न्याय, समाजकारण आणि लोककल्याण यांचा अद्भुत संगम घडवून आणणार्‍या अहिल्यादेवी या केवळ एका संस्थानाच्या राणी नव्हत्या, तर त्या लोकांच्या सुखदुःखात सहभागी होणार्‍या एक संवेदनशील माता होत्या. त्यांचे संपूर्ण जीवन हे कर्तव्य, त्याग, प्रामाणिकपणा आणि लोकसेवेचा आदर्श मानले जाते. त्यांच्या कार्याचा प्रभाव आजही समाजजीवनावर जाणवतो. स्त्रीशक्तीचे एक प्रभावी प्रतीक म्हणून त्यांच्याकडे पाहिले जाते. समाजातील दुर्बल घटकांना आधार देत न्याय आणि सुशासनाचा आदर्श उभा करणार्‍या अहिल्यादेवी होळकर यांचे व्यक्तिमत्त्व जितके प्रेरणादायी आहे तितकेच अभ्यासपूर्ण देखील आहे.

अहिल्यादेवी होळकर यांचा जन्म ३१ मे १७२५ रोजी महाराष्ट्रातील अहिल्यानगर (अहमदनगर) जिल्ह्यातील चौंडी या गावी झाला. त्यांचे वडील माणकोजी शिंदे हे त्या गावचे पाटील होते. ग्रामीण वातावरणात वाढलेल्या अहिल्यादेवींना बालपणापासूनच संस्कार, कष्ट आणि समाजकल्याणाचे शिक्षण मिळाले. त्या काळात मुलींना शिक्षण देण्याची परंपरा फारशी नव्हती; परंतु माणकोजी शिंदे यांनी आपल्या कन्येला शिक्षण देण्याचा निर्णय घेतला. त्यातूनच अहिल्यादेवींच्या व्यक्तिमत्त्वात संवेदनशीलता, विचारशीलता आणि निर्णयक्षमता विकसित झाली. बालपणापासूनच त्यांना ग्रंथांचे वाचन, लोकांशी प्रेमाने वागणे आणि संकटात धैर्य राखणे यांचे संस्कार मिळाले होते. त्यांचे व्यक्तिमत्त्व साधेपणा आणि आत्मविश्वासाने परिपूर्ण होते.

एक प्रसंग त्यांच्या आयुष्याला निर्णायक वळण देणारा ठरला. मराठा साम्राज्यातील पराक्रमी सरदार मल्हारराव होळकर हे पुण्याकडे जात असताना चौंडी येथे थांबले होते. त्या वेळी त्यांनी मंदिरात भक्तिभावाने पूजा करणार्‍या अहिल्याबाईंचे दर्शन घेतले. त्यांच्या शांत, संयमी आणि तेजस्वी व्यक्तिमत्त्वाने प्रभावित होऊन मल्हाररावांनी आपला पुत्र खंडेराव होळकर यांच्याशी त्यांचा विवाह करण्याचा निर्णय घेतला. अल्पवयातच त्यांचा विवाह इंदूरच्या होळकर घराण्यात झाला आणि त्या होळकर घराण्याच्या सून बनल्या. विवाहानंतर त्यांनी केवळ राजघराण्याच्या परंपरा जपल्या नाहीत, तर प्रशासन आणि लोककल्याणाची जाणही आत्मसात केली.

मल्हारराव होळकर हे पराक्रमी, दूरदृष्टी असलेले आणि अनुभवी प्रशासक होते. त्यांनी अहिल्यादेवींना राज्यकारभाराचे प्रशिक्षण दिले. युद्धनीती, न्यायदान, आर्थिक व्यवहार, प्रजेच्या अडचणी आणि प्रशासनातील बारकावे यांचे ज्ञान त्यांनी अहिल्यादेवींना दिले. त्या काळात स्त्रियांना राज्यकारभारात स्थान मिळणे दुर्मीळ होते; मात्र अहिल्यादेवींनी आपल्या बुद्धिमत्तेच्या जोरावर हे आव्हान समर्थपणे स्वीकारले. त्यांना लोकांच्या समस्या समजून घेण्याची आणि त्यावर संवेदनशीलतेने उपाय करण्याची विलक्षण क्षमता होती.

अहिल्यादेवींच्या आयुष्यात अनेक दुःखद प्रसंग आले. त्यांचे पती खंडेराव होळकर यांचा कुंभेरच्या युद्धात मृत्यू झाला. त्या वेळी सती जाण्याचा समाजाचा दबाव होता; परंतु मल्हारराव होळकर यांनी त्यांना सती जाण्यापासून रोखले. हा निर्णय भारतीय इतिहासात अत्यंत महत्त्वाचा मानला जातो. कारण त्यातून एका महान राज्यकर्तीचा उदय झाला. पुढे मल्हारराव होळकर यांचे निधन झाले आणि काही काळानंतर त्यांच्या पुत्राचाही मृत्यू झाला. सततच्या वैयक्तिक दुःखांनी खचून न जाता अहिल्यादेवींनी धैर्याने राज्यकारभाराची सूत्रे हातात घेतली. एका स्त्रीने इतक्या प्रतिकूल परिस्थितीत नेतृत्व स्वीकारणे ही त्या काळात अत्यंत धाडसी बाब होती.

अहिल्यादेवी होळकर यांनी इंदूर संस्थानाचा कारभार अत्यंत कुशलतेने चालविला. त्यांनी महेश्वर ही आपली राजधानी केली. नर्मदेच्या काठी वसलेले महेश्वर त्यांच्या कारकिर्दीत सांस्कृतिक आणि आर्थिक दृष्ट्या समृद्ध झाले. त्यांनी राज्यातील प्रशासनात पारदर्शकता आणि शिस्त आणली. त्यांच्या दरबारात न्यायदान अत्यंत निष्पक्षपणे केले जाई. गरीब असो किंवा श्रीमंत, सर्वांना समान न्याय मिळत असे. त्या स्वतः जनतेच्या तक्रारी ऐकत असत. लोकांच्या समस्या समजून घेऊन तत्काळ उपाययोजना करण्यावर त्यांचा भर होता. त्यांच्या प्रशासनात भ्रष्टाचाराला स्थान नव्हते.

अहिल्यादेवींच्या राज्यकारभाराचे सर्वात मोठे वैशिष्ट्य म्हणजे लोककल्याणाची भावना. त्यांनी प्रजेच्या सुखाला सर्वोच्च प्राधान्य दिले. शेतकर्‍यांसाठी सिंचन व्यवस्था, विहिरी, तलाव आणि धरणांची उभारणी करण्यात आली. व्यापार्‍यांना सुरक्षित वातावरण दिले गेले. व्यापार आणि उद्योगांना प्रोत्साहन दिल्यामुळे आर्थिक प्रगती झाली. महेश्वरी साड्यांच्या परंपरेला त्यांनी चालना दिली. आजही महेश्वरी साडी ही भारतीय वस्त्रसंस्कृतीचा अभिमान मानली जाते.

अहिल्यादेवींनी महिलांच्या सन्मानासाठी आणि सुरक्षेसाठी अनेक निर्णय घेतले. स्त्रियांच्या समस्या समजून घेऊन त्यांना आधार देण्याचे कार्य त्यांनी केले. विधवा महिलांना समाजात सन्मानाने जगता यावे यासाठी त्यांनी प्रयत्न केले. स्त्रियांना मालमत्तेचे अधिकार मिळावेत, त्यांच्यावर अन्याय होऊ नये, यासाठी त्या जागरूक होत्या. स्त्री ही केवळ घरापुरती मर्यादित नसून समाजनिर्मितीत तिची महत्त्वाची भूमिका आहे, हा संदेश त्यांच्या जीवनातून दिसून येतो.

अहिल्यादेवी होळकर यांची न्यायव्यवस्था अत्यंत प्रभावी होती. त्यांच्या दरबारात अन्यायाला मुळीच थारा नव्हता. त्या प्रत्येक प्रकरणाचा बारकाईने अभ्यास करून निर्णय घेत असत. लोकांना न्याय मिळावा यासाठी त्या कटिबद्ध होत्या. त्यांचा न्याय निष्पक्ष आणि मानवतावादी होता. त्यामुळे जनतेमध्ये त्यांच्याबद्दल अपार आदर निर्माण झाला. प्रजेच्या कल्याणासाठी त्यांनी प्रशासनातील अधिकार्‍यांवर नियंत्रण ठेवले. चुकीचे वर्तन करणार्‍यांना कठोर शिक्षा दिली जाई.

अहिल्यादेवींच्या राज्यात शांतता आणि सुव्यवस्था होती. त्यांनी सैन्य व्यवस्था मजबूत ठेवली. शत्रूंचा सामना करण्यासाठी आवश्यक ते निर्णय घेतले. परंतु युद्धापेक्षा शांततेला आणि विकासाला त्यांनी अधिक महत्त्व दिले. त्यांच्या प्रशासनात आर्थिक शिस्त होती. राज्याच्या उत्पन्नाचा उपयोग लोककल्याणासाठी करण्यात येत असे. खर्चात काटकसर आणि जनहिताचा विचार हा त्यांच्या प्रशासनाचा पाया होता.

अहिल्यादेवींच्या व्यक्तिमत्त्वात धार्मिकता होती; परंतु ती अंधश्रद्धेवर आधारित नव्हती. त्यांचा धर्म म्हणजे मानवसेवा होता. गरीब, गरजू आणि पीडित लोकांना मदत करणे हेच खरे धर्मकार्य आहे, असा त्यांचा दृष्टिकोन होता. त्यांनी अनेक दानधर्म केले. अन्नछत्रे चालवली. यात्रेकरू, साधू-संत आणि गरजू लोकांसाठी निवासव्यवस्था केली. त्यांचे जीवन अत्यंत साधे होते. राजसत्ता असूनही त्यांनी वैभवापेक्षा सेवेला महत्त्व दिले.


त्यांच्या जीवनातील साधेपणा आजच्या काळातही प्रेरणादायी वाटतो. त्या राजवाड्यात राहत असल्या तरी त्यांच्या वागण्यात अहंकार नव्हता. त्या सामान्य लोकांशी प्रेमाने संवाद साधत असत. जनतेच्या दुःखात सहभागी होणे आणि त्यांच्या समस्या स्वतः समजून घेणे हे त्यांच्या स्वभावाचे वैशिष्ट्य होते. त्यामुळेच लोकांनी त्यांना 'लोकमाता' ही उपाधी दिली.

अहिल्यादेवी होळकर यांनी शिक्षण आणि संस्कृतीच्या जतनासाठीही महत्त्वाचे योगदान दिले. त्यांनी विद्वान, कवी, पंडित आणि कलाकारांना आश्रय दिला. महेश्वर हे त्या काळात संस्कृती आणि साहित्याचे केंद्र बनले. सांस्कृतिक परंपरांचे जतन करण्याबरोबरच त्यांनी लोककलेलाही प्रोत्साहन दिले. समाजातील नैतिक मूल्ये टिकून राहावीत यासाठी त्यांनी प्रयत्न केले.

भारतीय स्त्रीशक्तीचा विचार केला तर अहिल्यादेवींचे नाव अत्यंत आदराने घेतले जाते. त्यांनी संकटांना न घाबरता नेतृत्व स्वीकारले. वैयक्तिक दुःख बाजूला ठेवून जनतेच्या हितासाठी कार्य केले. त्यांचे जीवन हे संघर्षातून उभे राहिलेल्या यशाचे उदाहरण आहे. आजच्या महिलांसाठी त्यांचे कार्य प्रेरणादायी आहे. आत्मविश्वास, निर्णयक्षमता, कर्तव्यनिष्ठा आणि लोकसेवा या गुणांचा आदर्श त्यांच्या व्यक्तिमत्त्वातून दिसतो.

आजच्या काळात प्रशासनात पारदर्शकता, न्याय आणि लोकाभिमुखता यांची आवश्यकता अधिक जाणवते. अशा वेळी अहिल्यादेवी होळकर यांचे कार्य मार्गदर्शक ठरते. त्यांनी सत्ता ही जनसेवेचे साधन मानली. आज अनेक ठिकाणी भ्रष्टाचार, अन्याय आणि स्वार्थी राजकारण दिसून येते; परंतु अहिल्यादेवींच्या प्रशासनात प्रामाणिकपणा आणि नैतिकता सर्वोच्च होती. म्हणूनच त्यांच्या कार्याचा अभ्यास आजही प्रशासनशास्त्र आणि समाजकारणाच्या दृष्टीने महत्त्वाचा मानला जातो.

अहिल्यादेवींच्या कार्यातून महिला सक्षमीकरणाचा प्रभावी संदेश मिळतो. त्या काळात



स्त्रियांना अनेक सामाजिक बंधने होती; तरीही त्यांनी आपल्या कर्तृत्वाने इतिहासात अजरामर स्थान मिळविले. त्यांनी सिद्ध करून दाखवले की स्त्री सक्षम असेल तर ती राज्यकारभार, समाजकारण आणि नेतृत्व या सर्व क्षेत्रांत यशस्वी होऊ शकते. त्यांचे जीवन महिलांसाठी प्रेरणास्रोत आहे.

भारतीय संस्कृती आणि परंपरेचे जतन करण्यात अहिल्यादेवींचे योगदान अनन्यसाधारण आहे. त्यांनी केवळ धार्मिक स्थळांचा जीर्णोद्धार केला नाही, तर सांस्कृतिक एकात्मतेलाही बळ दिले. उत्तर ते दक्षिण भारतातील अनेक तीर्थक्षेत्रांवर त्यांनी कामे केली. यामुळे देशाच्या सांस्कृतिक ऐक्याला चालना मिळाली. त्यांच्या कार्यातून राष्ट्रीय एकात्मतेची भावना दिसून येते.

महेश्वर नगरीला त्यांनी दिलेली सांस्कृतिक ओळख आजही टिकून आहे. नर्मदेच्या घाटांवर उभे असलेले मंदिरसमूह, राजवाडे आणि वास्तू त्यांच्या दूरदृष्टीची साक्ष देतात. महेश्वरी वस्त्रोद्योगाला त्यांनी दिलेले प्रोत्साहन आजही हजारो कुटुंबांच्या उपजीविकेचे साधन आहे. स्थानिक उद्योगांना प्रोत्साहन देऊन आर्थिक स्वावलंबन वाढविण्याचा त्यांचा दृष्टिकोन अत्यंत प्रगत होता.

अहिल्यादेवींच्या जीवनातील आणखी एक महत्त्वाचा पैलू म्हणजे संकटसमयी दाखवलेले धैर्य. सततच्या कौटुंबिक दुःखांनंतरही त्यांनी खचून न जाता जनतेच्या हितासाठी काम केले. वैयक्तिक दुःख बाजूला ठेवून कर्तव्याला प्राधान्य देणे ही त्यांच्या व्यक्तिमत्त्वाची महानता होती. त्यांच्या जीवनातून आपल्याला संकटांवर मात करून पुढे जाण्याची प्रेरणा मिळते.

**लेखक**
**– डॉ. राजेंद्र बगाटे**

# जोडीदाराच्या प्रेमाचे नाते घट्ट करण्यासाठी



**१. मोकळा संवाद**
कोणत्याही नात्याचा पाया संवाद असतो. तुमच्या मनातील भावना जोडीदाराला थेट आणि प्रामाणिकपणे सांगा. फक्त स्वतःचे बोलणे न ऐकता जोडीदाराचे म्हणणेही शांतपणे ऐकून घ्या२. लहान-सहान गोष्टींमधून प्रेम व्यक्त कराप्रेम व्यक्त करण्यासाठी महागड्या भेटवस्तूंचीच गरज असते असे नाही छोट्या कृती जसे की:अचानक एखादा गोड मेसेज पाठवणेत्यांच्या आवडीचा पदार्थ बनवणे किंवा आणणेएकमेकांना वेळ देणे३. एकमेकांचा आदर कराप्रत्येक व्यक्तीचा स्वतःचा असा स्वभाव असतो. जोडीदाराच्या विचारांचा आणि निर्णयांचा आदर करा. नात्यात 'मी' पेक्षा 'आपण' या भावनेला महत्त्व द्या.४. जोडीदाराला प्राधान्य द्यातुमच्या जोडीदाराला आयुष्यात नेहमी महत्त्वाचे स्थान द्या. त्यांना स्पेशल वाटेल अशा छोट्या सरप्राईझ किंवा डेट्स प्लॅन करत राहा५. चुका माफ करायला शिकाप्रत्येक व्यक्तीकडून काही ना काही चुका होतात.

# अंथरुणाला खिळलेली माणसं

थकलेली माणसे : विजय तरवडे

उतारवयात पाय घसरून किंवा जिन्यावरून पडणे आणि खुब्याचे हाड मोडणे ही समस्या अनेक घरात आढळते. मुळातच, आपल्या मनात खोलवर सर्जनच्या सुरीची भीती दडलेली असते. तरुणपणी देखील माणसं कोणतेही ऑपरेशन-सर्जरी टाळण्याचा कसोशीने प्रयत्न करतात. त्यासाठी वाटेल ते इतर पॅथीचे, घरगुती, ऐकीव उपचार करीत असतात. त्यामुळे उतारवयात पडण्याचा आणि खुब्याचे हाड मोडण्याचा प्रसंग आला तर, विचारायलाच नको. ऑर्थोपेडीक क्लिनिकमध्ये नेल्यावर एक्स-रे तपासण्या होतात आणि डॉक्टर सर्जरीचा सल्ला देतात. पण, तो सल्ला देताना अनेकदा हलक्या आवाजात- या वयात त्यांना झेपेल की, नाही... असं पुटपुटतात आणि तेवढेच शब्द रुग्ण ऐकतो. सर्जरी टाळायची म्हणून रुग्ण बेडरिडन राहणे पसंत करतो आणि मग रुग्णाची आणि त्याच्या 'पालकांची' सत्त्वपरीक्षा सुरू होते. सर्जरी करायची की, नाही हा निर्णय घेण्यापूर्वी सेकंड ओपिनियन घेता आले तर अवश्य घ्यावे. हाड मोडल्यामुळे किंवा अन्य कारणांमुळे बेडरिडन होणारे रुग्ण सहसा ऐंशी किंवा अधिक वयाचे असतात. साठीच्या उंबरठ्यावर असलेली मुलं-सुना-जावई यांचे पालक असतात. या पालकांना आपले इतर व्याप सांभाळून रुग्णाची परिचर्या करावी लागते. ऑर्थोपेडीक क्लिनिकमध्ये प्राथमिक माहिती दिली जातेच. त्याखेरीज काही स्वानुभवाचे बोल इथे देत आहे. रुग्णासाठी आधी वेगळी खाट विकत किंवा भाड्याने आणावी लागते. या खाटेला असलेल्या विजेच्या बटनांनी किंवा हॅन्डलने रुग्णाला बसते करता येते. शिवाय तिला चाके असतात.

सतत एकाच ठिकाणी पडून राहिल्याने रुग्णाला कंटाळा येतो, बोलायला कोणी नसेल त्याची चिडचिड होते. त्याचा चिडचिडेपणा शांतपणे समजून घ्यावा लागेल. त्याच्या डोळ्यांसमोरच्या भिंतीवर टीव्ही बसवता येईल. अनेक सेवाभावी संस्था-व्यक्ती अशा रुग्णांशी बोलायला, सहवास द्यायला येतात. त्यांचा आंतरजालावर शोध घेतला तर, रुग्णाला दिवसातून काही वेळ 'कंपनी' मिळते. एकाच खोलीत राहून रुग्णाला कंटाळा



आला तर, खाट अधूनमधून बाहेरच्या खोलीत नेता येईल. सतत निजून राहणार्या रुग्णाची पचनशक्ती विशेष समर्थ उरलेली असते. या बाबतीत रुग्णाला झेपेल इतकाच आणि योग्य आहार द्यावा. त्याचे हट्ट जुमानू नयेत. ऐंशी आणि अधिक वयाच्या रुग्णाला किमानपक्षी रक्तदाब आणि मधुमेह वगैरे असू शकतात. त्याच्या गोळ्या वेळेवर देणे, ही एक जबाबदारी झाली. या वयात रुग्णाचे नैसर्गिक विधींवर नियंत्रण असते-नसते. त्यासाठी त्याला डायपर्स आणावे लागतात. सर्जिकल उपकरणांच्या दुकानात घाऊक दरात थोडे स्वस्त मिळतात. यांची विल्हेवाट लावण्यासाठी मनपाच्या स्वच्छता कर्मचार्यांची मदत घ्यावी लागते. रुग्णाचे डायपर्स नियमित बदलणे, कपडे बदलणे, स्पंजिंग करणे यासाठी परिचारिकेची सशुल्क सेवा घेता येते. अन्यथा घरातील सदस्याला न कंटाळता या गोष्टी कराव्याच लागतात. सतत निजून राहिल्याने रुग्णाला बेड सोर्सचा त्रास होतो. तो कमी करण्यासाठी हवेची गादी मिळते. तिला विद्युत प्रवाह लागतो. रुग्णाला पार्किन्सन्सचा त्रास असेल तर, गादीच्या वायर्स लांब ठेवाव्यात. पार्किन्सन्समुळे क्वचित रुग्णाचे हात-पाय वेडेवाकडे हलले तर, वायर तुटू शकते. कितीही काळजी घेतली तरी, रुग्णाला बेड सोर्स होतातच. उन्हाळ्याच्या दिवसात हा त्रास अधिक होतो. या जखमांवर मलमपट्टी करणे, हा रुग्णासाठी वेदनादायी अनुभव असतो. ॲलोपथी किंवा अन्य प्रकारच्या पद्धती वापरता येतात. तुमच्या नेहमीच्या डॉक्टरच्या सल्ल्याने सोयीची औषधे-मलमे वापरावीत. हे काम जवळ राहणारी एखादी परिचारिका माफक शुल्कात करणार असेल तर चांगलेच. अन्यथा कुटुंबातील व्यक्तींना हे शिकून घ्यावे लागते.

सलाईनच्या पाण्याने जखम स्वच्छ धुवून, समोर पंखा लावून, ती जागा कोरडी करून, मलमपट्टी करावी. आजूबाजूला कॅन्डीडसारखी एखादी जंतूनाशक पावडर वापरावी. एखाद्या प्रसंगी मलम उपलब्ध नसेल तर, आयत्या वेळचा उपाय म्हणून हळदीचा देखील वापर करतात. जखम पाठीवर असेल तर, तिला धक्का लागणार नाही, अशा बेताने शेजारी मऊ उशी ठेवून निजावे किंवा काही वेळ रुग्णाला बसते करावे, कुशीवर पहुडायला सांगावे. एक महत्त्वाची सूचना- घरात असा रुग्ण असेल तर, त्याच्या समाचाराला येणार्या लोकांना आधी एक सक्त ताकीद द्यावी. ती म्हणजे त्यांनी रुग्णाला भिववणारे ऐकीव अनुभव सांगू नयेत- आमच्या ओळखीची अशीच एक व्यक्ती होती... तिनं फार दिवस काढले नाहीत... तिला अमुक रोग झाला आणि त्यातच गेली... डॉक्टरांवर विश्वास नका ठेवू... डॉक्टरऐवजी अमुक महाराजांना, बुवाला एकदा दाखवून पाहा, तमुक औषध घेऊन पाहा, फलाण्या ठिकाणी नवस बोला, वगैरे सल्ले देऊन रुग्णाचे मन विचलित करू नये...

# चुकीच्या धोरणांमुळे आजचे आलेले संकट !

अजित अभ्यंकर, (राजकीय विश्लेषक)

सरकारने आणि समाजाने मिळून ताज्या युद्धजन्य परिस्थितीतून कोणते दीर्घकालीन धोरणात्मक धडे घ्यायचे, हे तपासत आर्थिक धोरणांमधील उणीवा ओळखायला हव्यात. या मुद्याचा विचार खरे तर, देशाच्या दीर्घकालीन आर्थिक सुरक्षिततेच्या आणि परराष्ट्र संबंधांच्या संदर्भाने केला पाहिजे. परंतु पंतप्रधान नरेंद्र मोदी कायम निवडणुकीच्या प्रचारसभेतच भाषण करण्याच्या मानसिकतेमध्ये असतात. ही अधिक चिंतेची बाब आहे.

पश्चिम आशियातील युद्ध भारताला आपल्या आर्थिक धोरणांचा पुनर्विचार करण्याची संधी देत आहे. या मुद्याचा विचार खरे तर देशाच्या दीर्घकालीन आर्थिक सुरक्षिततेच्या आणि परराष्ट्र संबंधांच्या संदर्भानेच केला पाहिजे. परंतु सरकारकडून तसे होताना दिसत नाही.पंतप्रधान नरेंद्र मोदी कधीच देशाचे पंतप्रधान म्हणून बोलत नाहीत. त्यामुळे पश्चिम बंगाल, तामिळनाडू, केरळच्या निवडणुकांच्या प्रचारात देशासमोर कोणतेही आर्थिक आव्हान नाही, असे सांगणारे मोदी निवडणुका संपल्यानंतर आर्थिक आणीबाणी असल्याप्रमाणे आवाहने करत आहेत. राजकीय व्यवस्थेला विश्वासात घेण्यापेक्षा विरोधी पक्षांवर मात करणे, त्यांना देशद्रोही ठरवणे हा मोदी-शहांचा एकमेव अग्रक्रम दिसतो. ही बाब आर्थिक स्थितीपेक्षादेखील चिंताजनक आहे. मोदी सरकारची गेल्या दहा वर्षांमधील बहुतेक आर्थिक धोरणांची दिशा निश्चितपणे अयोग्य होती. पण तरीही आज निर्माण झालेले प्रश्न गेल्या अनेक दशकांपासून भारताने स्वीकारलेल्या आर्थिक धोरणांचा आणि त्यामागील विचारसरणीचा परिणाम आहे.या प्रक्रियेत सर्वात मोठा आणि चिंताजनक मुद्दा म्हणजे भारतीय रुपयाची घसरण. डॉलरच्या तुलनेत रुपयाचे मूल्य सातत्याने कमी होत आहे. डॉलरच्या तुलनेत ९५-९६ रुपयांवर असलेली रुपयाची किंमत भविष्यात आणखी मोठ्या प्रमाणात घसरण्याची शक्यता नाकारता येत नाही. भारत आपल्या गरजेपैकी सुमारे ८५ टक्के खनिज तेल आयात करतो. तेलाच्या किंमती वाढल्या की भारताला अधिक डॉलर मोजावे लागतात.

ही अतिरिक्त डॉलरची गरज भागवण्यासाठी निर्यात वाढवावी लागेल. पण युद्धजन्य परिस्थितीमध्ये जागतिक व्यापार मंदावला आहे. ज्या देशांना भारत निर्यात करतो, तेच पश्चिमी देश आर्थिक संकटात सापडले तर त्यांच्या खरेदीक्षमतेवर परिणाम होतो. उद्योग बंद पडतात, मागणी कमी होते आणि आंतरराष्ट्रीय व्यापारावर परिणाम होतो. अशा वेळी भविष्यात भारताची निर्यात वाढण्याऐवजी कमी होण्याची शक्यता अधिक आहे. परिणामी, परकीय चलनाचा तुटवडा निर्माण होण्याचा धोका वाढत आहे. परदेशात राहणारे भारतीय हा भारतासाठी परकीय चलनाचा आणखी एक मोठा स्रोत आहेत. लाखो भारतीय विदेशात काम करतात आणि भारतातील कुटुंबियांना पैसे पाठवतात. परंतु युद्धामुळे पश्चिमी देशांमधील उद्योगांमध्ये मंदी येत आहे आणि रोजगाराच्या संधी कमी होत आहेत. त्यामुळे भविष्यात भारतात येणार्या या परकीय चलनात घट होऊ शकते. याच वेळी भारतात येणारी परकीय गुंतवणूकही कमी होत असल्याचे दिसते. उलट, काही श्रीमंत भारतीयांनी परदेशात गुंतवणूक करण्यास आणि परदेशी नागरिकत्व स्वीकारण्यास सुरुवात केली आहे. जहाज बुडण्याची चाहूल लागली की उंदीर आधी बाहेर पडतात, अशी उपमा अनेकदा दिली जाते. भारतातील धनिक



उद्योजक हे जहाजावरचे उंदीर आहेत, आर्थिक अस्थिरतेच्या भीतीमुळे काही मोठे भांडवलदार आपला पैसा भारताबाहेर हलवत आहेत. यामुळे भारतातून डॉलर बाहेर जातो आणि परकीय चलनावरील दबाव अधिक वाढतो.

या संपूर्ण परिस्थितीमध्ये सोन्याचा मुद्दा अत्यंत महत्त्वाचा ठरतो. भारतात सोन्याला सांस्कृतिक, सामाजिक आणि आर्थिकदृष्ट्या विशेष स्थान आहे. पण हेच सोने भारतीय अर्थव्यवस्थेच्या गळ्याला लागलेला फास ठरत आहे. भारतात वापरले जाणारे बहुतांश सोने आयात केले जाते. मागील वर्षी भारताने सुमारे ७१५ टन सोने आयात केले, तर एका दशकाची सरासरी वार्षिक ८०० टनांच्या आसपास आहे. केवळ दागिन्यांसाठीच नाही, तर मोठ्या प्रमाणात काळा पैसा साठवण्यासाठीही सोन्याचा वापर केला जातो, अशी टीका अनेक अर्थतज्ज्ञ करतात. काही ठिकाणी भ्रष्ट व्यवहारांमध्येही सोन्याचा वापर होतो, अशी चर्चा आहे. त्यामुळे सोन्याची मागणी सतत वाढत राहते. या संदर्भात सरकारच्या धोरणांमधील विसंगती अधिक ठळकपणे दिसते. सरकारने २०२३ मध्ये सोन्यावर १५ टक्के असलेला कर सहा टक्के एवढा खाली आणला. तेव्हा सोन्याची जास्त आयात व्हावी, असे उघड उद्दिष्ट होते. आता परिस्थिती गंभीर झाल्यावर आयात शुल्क ६ वरून १५ टक्क्यांपर्यंत वाढवले गेले. २०१५ मध्ये सरकारने गोल्ड बाँड योजना आणली. लोकांनी प्रत्यक्ष सोने खरेदी करण्याऐवजी आर्थिक गुंतवणूक करावी हा त्यामागील उद्देश होता. पण नंतर सोन्याच्या किंमती वाढू लागताच सरकारची भूमिका बदलली. भारताने सोन्याच्या अतिरेकी आयातीवर कठोर नियंत्रण आणण्याचा गांभिर्याने विचार करण्याची वेळ आली आहे. सोन्याच्या आयातीवर बंदी आणण्याऐवजी सरकार अत्यंत कमकुवत धोरण अवलंबत आहे. भारताच्या वाढत्या तेल आयातीमागे आणखी एक महत्त्वाचा सामाजिक आणि आर्थिक बदल कारणीभूत आहे. मध्यमवर्गीय माणसासाठी मोटार ही आता केवळ गरज नाही, तर प्रतिष्ठेचे प्रतीक बनली आहे. सरकारनेही रेल्वेच्या जाळ्याचा विस्तार करण्याऐवजी वाहन उद्योगाला मोठे प्रोत्साहन दिले. महामार्ग, एक्सप्रेस वे मोठ्या प्रमाणात विकसित करण्यात आले. परंतु इंधनाच्या दृष्टीने सर्वात किफायतशीर आणि स्वस्त वाहतूक व्यवस्था मानल्या जाणार्या रेल्वेसारख्या सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेकडे दुर्लक्ष झाले. कमी खर्चात मोठ्या प्रमाणात प्रवासी आणि माल वाहून नेण्याची क्षमता रेल्वेकडे आहे. तरीही खासगी वाहनांना अधिक प्रोत्साहन मिळाल्याने तेलाची मागणी झपाट्याने वाढली. मुळातच मर्यादित असणार्या रेल्वेमार्गांवरच 'वंदे भारत'सारख्या वेगवान आणि आकर्षक गाड्या सुरू झाल्या, पण सामान्यांसाठी आवश्यक असलेली व्यापक रेल्वे क्षमता आणि मालवाहतूक व्यवस्था तितक्या प्रभावीपणे मजबूत झाली नाही. भारताला खनिज तेलावरील अवलंबित्व कमी करायचे असेल तर रेल्वे आणि सार्वजनिक वाहतूक सक्षम करणे अपरिहार्य आहे. अन्यथा, तेलाच्या वाढत्या किंमतींचा फटका बसत राहील. पेट्रोल आणि डिझेलच्या किंमती हा ही लोकांच्या संतापाचा विषय बनला आहे.

मोदी सरकार सत्तेत आले तेव्हा आंतरराष्ट्रीय बाजारात खनिज तेलाची ची किंमत सुमारे १०८ डॉलर प्रति बॅरल होती. त्यानंतर अनेक वर्षे ती ६० ते ७० डॉलरपर्यंत खाली राहिली. तरीसुद्धा भारतातील पेट्रोल-डिझेलचे दर फारसे कमी झालेले दिसले नाहीत. उलट, आंतरराष्ट्रीय बाजारात तेल स्वस्त असतानाही सरकारने त्यावरील कर वाढवले. गेली किमान पाच वर्षे भारतात पेट्रोल शंभर रुपयांच्या पुढे होते. म्हणजेच केवळ आंतरराष्ट्रीय बाजार नव्हे, तर सरकारची कररचनादेखील महागाईसाठी मोठ्या प्रमाणात जबाबदार ठरते.

अप्रत्यक्ष करांमुळे सर्वसामान्य माणसावर आर्थिक भार पडतो. सरकारी महसूल वाढवण्यासाठी अप्रत्यक्ष करांवर जास्त अवलंबून राहण्याऐवजी प्रत्यक्ष करांचे प्रमाण वाढवण्याची गरज आहे. कॉर्पोरेट प्रॉफिट टॅक्स, इन्कम टॅक्स आणि उच्च उत्पन्न गटावरील करवसुली अधिक प्रभावीपणे केली पाहिजे. कारण अप्रत्यक्ष करांचा सर्वाधिक फटका गरीब आणि मध्यमवर्गीय नागरिकांना बसतो. पेट्रोल, डिझेल, सेवा आणि वस्तूंवरील वाढते कर अखेरीस महागाई वाढवतात. आज भारतासमोरील संकट केवळ युद्धामुळे निर्माण झालेले नाही; तो अनेक वर्षांच्या धोरणात्मक विसंगतींचा परिणाम आहे. देशातील श्रीमंत लोक करसवलतींसाठी परदेशी नागरिकत्व स्वीकारत असतील, भांडवल विदेशात नेत असतील आणि देशातील उत्पादनक्षम गुंतवणूक कमी होत असेल, तर हा सरकारच्या धोरणात्मक अपयशाचा मुद्दा आहे. ताज्या युद्धाने भारताला एक कठोर वास्तव दाखवले आहे. आयात, तेल, सोने आणि परकीय भांडवल यांवर अवलंबून राहून दीर्घकालीन आर्थिक स्थैर्य निर्माण होऊ शकत नाही. भारताला स्वावलंबी, उत्पादनक्षम आणि आर्थिकदृष्ट्या सक्षम बनवायचे असेल, तर आता कठोर पण दूरदृष्टीचे निर्णय घेण्याची वेळ आली आहे.-(**शब्दांकन: उत्कर्षा सुमित**)

## १ Doctor Tips सल्ला डॉक्टरचा



ममुरुमं..फ हा शब्द ऐकल्यावर अनेकांच्या कपाळावर आठ्या येतात. इंटरनेटवर मॲक्नेफ अर्थात मुरमं, तारुण्यपिटिकांच्या समस्येबद्दलची खरीखोटी माहिती दिलेली असते. जुन्याजाणत्यांच्या अनुभवांपासून ते मैत्रीपूर्ण सल्ल्यांपर्यंत, केमिस्टकडे मिळणाऱ्या औषधांपेक्षा परिणामकारक असल्याचा दावा करणाऱ्या घरगुती उपचारांपासून ते नैसर्गिक उपचारांपर्यंत साऱ्यांचा भडिमार होताना दिसतो. त्यामुळे आपल्या ममुरुमांफवरील उपचारांना सुरुवात करण्यापूर्वी या समस्येशी जोडलेल्या गैरसमजांपासून स्वत:ला दूर नेणे आवश्यक आहे.ममुरुमांफशी संबंधित काही सर्वसाधारण मिथके आणि या गोष्टी कपोलकल्पित का आहेत.

## २ Joke विनोद




गुरूजी : सांग असत्यवादी मोठा की सत्यवादी?
शिष्य : असत्यवादी.
गुरूजी : काहीतरी भलतंच कसं काय?
शिष्य : सत्यवादी चार अक्षरी शब्द आहे. असत्यवादी एका अक्षराने मोठा आहे.

## ३ Message संदेश




Babu apni girlfriend se- darling kal ghar par aa jana koi bhi nahi hoga!
Jab ladki ghar par aati hai to sachmuch koi nahi tha.
Ladka- kya me tumhara hath tham lu?
Ladki – No thanks ! ye itna bhari nahi he!!

## ४ Thought सुविचार




जागृतावस्थेतील व्याधींना निद्रा हेच एकमेव औषध.
-सर्वेटिस

**संस्कृत सुभाषित**
जीवन्तोऽपि मृता: पञ्च व्यासेन परिकीर्तिता: ।
दरिद्रो, व्याधितो, मूर्ख:, प्रवासी नित्यसेवक: ।।

अर्थ : दरिद्री, रोगी, मूर्ख, प्रवासी आणि वेठबिगार कामगार हे पाचजण जिवंत असून मेल्यासारखे आहेत अशी व्यासोक्ती आहे.

# मनोरंजक महाशब्दकोड्यांचा समाचार



**आडवे शब्द**
१. रावसाहेब रामराव – अर्थात गृहमंत्री आबांचे नाव
६. पोलिसांवरील अधिकारी
९. ही धरून लगडी घालतात
११. छिद्र, जखम
१२. जय पराजय
१४. घोंगड्या विणणारी जमात
१६. मोठा हातोडा
१७. रम्य दृश्य
१९. धमनी
२१. मला
२४. उपहास
२५. शरीर
२७. खरकट्याचा ढीग
२९. श्रीकृष्णाचे एक नाव
३१. वचक, भीती
३२. हिंदीत शरीर
३३. बारीक झिणझिण
३५. वाक्बगार
३७. अभिमन्यूला ठार मारणारा
३९. फायदा
४०. दहा अब्ज ही संख्या
४१. लाज
४३. रसाळ
४५. मूळ अर्थ शहाणा, सुंदर आणि प्रचलित अर्थ शहरी
४६. जाणे-येणे, वहिवाट
४८. पायताण
४९. सीतेची जुळी मुले
५१. खदक
४३. म--- रे झूठ मत बोलो, खुदा के पास जान हैफ
५४. पौराणिक आयुध
५५. ओझी उचलणारा
५७. सत्त्व
५९. जोखीम
६१. वाई-महाबळेश्वरमधील प्रसिद्ध घाट
६२. पोहणे
६४. गवताचे रुंद पान
६५. निवासस्थान
६६. मत देणारा
६८. उत्पन्नातील सरकारी हिस्सा
६९. भित्रा, पळ काढणारा
७०. कुलीन
७२. जाणकार
७५. पालव
७७. ढीग
७९. रक्तवाहिन्या
८०. जमीनदार
८१. कमीतकमी, निदान एवढे तरी!

**उभे शब्द**
१. संरक्षण
२. बाहेरच्या विरूद्ध
४. धरणातील पाणीसाठ्याचा प्रदेश
५. छोटी
६. सैनिक
७. जपणे
८. आवड
९. घट्ट, तणावाची स्थिती
१०. उष्ण
१३. प्रजा
१५. दृष्टीभेट
१६. गर्द, गच्च
१८. वेगाने
२०. शीतपेय
२२. सोनिया गांधी यांचे दिल्लीतील निवासस्थान या मार्गावर आहे
२३. खरे तर हे काही जेवण नव्हे!
२६. सापाला कधी धाकला म्हणू नये आणि याला आपला!
२८. माज
३०. आवाज, गोंगाट
३४. डोळ्यात तेल घालून करण्याचे काम
३५. विनाश
३६. राजालाही इथे नतमस्तक व्हावे लागते
३८. मृत्यूचा राजा
४१. संभवनीय
४२. पारशी जनतेचा वर्षारंभ दिन
४४. नूतन
४७. माळी, बागवान
५०. काढलेली खोडी
५२. जाडसर पीठ
५३. सर्व
५४. मारुती, भीम
५५. हिंदुस्थानी
५६. उपस्थित
५८. उत्सवाचे दिवस
६०. च्या बद्दल
६३. तरतूद
६४. साडी
६५. जात्याचा आवाज
६६. मधुमक्षिका
६७. शील, उदारता
६८. गव्हाचे बारीक पीठ
६९. पुन्हा
७१. नवरा
७३. नवरत्नांपैकी एक
७४. खेडे
७६. फितुरी
७७. भूपती
७८. माळ, हार

**आडवे उत्तर**
१.आर.आर. पाटील ६.फौजदार ९.तंगडी ११.क्षत १२.हारजीत १४.सनगर १६.घण १७.विलोभनीय १९.नस २१.मज २४.टर २५.तन २७.रमराट २९.दामोदर ३१.धाक ३२.बदन ३३.रवरव ३५.सराईत ३७.जयद्रथ ३९.लाभ ४०.खर्व ४१.शरम ४३.रसवान ४५.नागर ४६.राबता ४८.वहाण ४९.लवकुश ५१.चर ५३.सजन ५४.गदा ५५.भारवाहक ५७.कस ५९.जबाबदारी ६१.पसरणी ६२.जलतरण ६४.पात ६५.घर ६६.मतदार ६८.आयकर ६९.पळपुटा ७०.घरंदाज ७२.माहितगार ७५.पदर ७७.रास ७९.शीरा ८०.वतनदार ८१.गेला बाजार

**उभे उत्तर**
१.रक्षण ३.आत ४.पाणलोट ५.लहानी ६.फौजी ७.जतन ८.रस ९.तंग १०.गरम १३.रयत १५.नजरानजर १६.धनदाट १८.भरधाव २०.सरबत २२.जनपथ २३.उदरभरण २६.नवरा २८.मद ३०.रव ३४.रखवालदारी ३५.सर्वनाश ३६.ईश्वरचरणी ३८.यमराज ४१.शक्य ४२.नवरोज ४४.नव ४७.बनकर ५०.कुरापत ५२.रवा ५३.सकल ५४.गदाधर ५५.भारतीय ५६.हजर ५८.सणवार ६०.बाबत ६३.तजवीज ६४.पातळ ६५.घरघर ६६.मधमाशी ६७.दानत ६८.आटा ६९.परत ७१.दादला ७३.हिरा ७४.गाव ७६.दगा ७७.राजा ७८.सर



# क्रीडा विश्व



## थोडक्यात/ संक्षिप्त

### अहमदाबादमधून हवामान विषयी मोठी अपडेट

मुंबई–आयपीएल २०२६ च्या अंतिम सामन्याची क्रिकेट चाहत्यांना लागलेली उत्सुकता आता शिगेला पोहोचली आहे. ३१ मे रोजी अहमदाबादमध्ये रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू आणि गुजरात टायटन्स यांच्यात जेतेपदासाठी महामुकाबला रंगणार आहे. क्वालिफायर–१ मध्ये आरसीबीने गुजरातचा ९२ धावांनी पराभव करून थेट अंतिम फेरीत प्रवेश केला होता, तर गुजरातने क्वालिफायर–२ मध्ये दमदार पुनरागमन करत फायनलचे तिकीट मिळवले. मात्र, या मोठ्या सामन्यापूर्वी एकच प्रश्न सर्वांच्या मनात आहे. जर अंतिम सामन्यावर पावसाचे सावट आले आणि सामना होऊ शकला नाही, तर विजेता कसा ठरणार? ३१ मे रोजी सामना पावसामुळे थांबला तर? आयपीएलच्या नियमांनुसार अंतिम सामन्यासाठी राखीव दिवस (ीींन रब) ठेवण्यात आला आहे. जर ३१ मे रोजी पावसामुळे सामना सुरूच होऊ शकला नाही किंवा मध्येच थांबला, तर सामना जिथे थांबला तिथून पुढील दिवशी म्हणजे १ जूनला पुन्हा सुरू केला जाईल.

### मुंबई इंडियन्सला रामराम ठोकताच हार्दिक पांड्या...

मुंबई–२०२४ च्या आयपीएल हंगामात मुंबई इंडियन्सने रोहित शर्मा आणि सूर्यकुमार यादव यांसारख्या दिग्गज सीनियर खेळाडूंऐवजी बाहेरून आलेल्या हार्दिक पांड्यावर विश्वास दाखवत संघाची कप्तानी सोपवली होती. मात्र, रोहितला कर्णधारपदावरून हटवून हार्दिकला ही जबाबदारी देण्याचा निर्णय पूर्णपणे चुकीचा ठरल्याचे गेल्या तीन वर्षांतील आकडेवारीवरून स्पष्ट होत आहे. या सततच्या दबावामुळे हार्दिक पांड्या सध्या प्रचंड मानसिक तणावाचा सामना करत असून, आयपीएल २०२६ च्या हंगामानंतर त्याने मुंबई इंडियन्स सोडण्याचा मोठा निर्णय घेतल्याची माहिती समोर येत आहे.मीडिया रिपोर्ट्सनुसार, हार्दिकने मुंबई इंडियन्सच्या व्यवस्थापनाकडे आपली भूमिका स्पष्ट केली असून, तो संघ सोडण्यास उत्सुक आहे. जर आगामी लिलावात हार्दिक पांड्याचे नाव आले, तर अनेक संघ त्याच्यावर कोट्यवधी रुपयांचा वर्षाव करण्यास तयार आहेत. त्याला आपल्या संघात घेण्यासाठी तब्बल ३० कोटी रुपयांपर्यंतची बोली लागण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

### ३० कोटींच्या शर्यतीत सीएस-के, केकेआर आणि दिल्ली!

मुंबई–आयपीएल २०२६ मध्ये मुंबई इंडियन्सच्या निराशाजनक कामगिरीनंतर संघात मोठे बदल होण्याची शक्यता आहे. कर्णधार हार्दिक पांड्या मुंबई इंडियन्स सोडण्याच्या तयारीत असल्याची चर्चा क्रिकेट वर्तुळात रंगली आहे. यामुळे चाहत्यांमध्ये मोठी उत्सुकता निर्माण झाली आहे. आगामी लिलावात हार्दिकवर विक्रमी बोली लागू शकते, असा अंदाज व्यक्त केला जात आहे. २०२४ मध्ये मुंबई इंडियन्सने रोहित शर्माकडून कर्णधारपद काढून हार्दिक पांड्याकडे सोपवले होते. मात्र गेल्या तीन हंगामांमध्ये संघाला अपेक्षित यश मिळाला नाही. २०२६ मध्ये तर मुंबईचा संघ गुणतालिकेत नवव्या स्थानावर राहिला. त्यामुळे व्यवस्थापन आणि चाहत्यांमध्ये नाराजी वाढल्याचे बोलले जात आहे. मीडिया रिपोर्ट्सनुसार, हार्दिकने मुंबई इंडियन्स व्यवस्थापनाकडे आपली भूमिका स्पष्ट केली आहे.

## आशियाई स्पर्धा: निवड चाचणीत विनेश फोगट पराभूत

विनेश फोगटचे आंतरराष्ट्रीय कुस्तीतील पुनरागमन लांबणीवर पडले आहे. उच्च आणि सर्वोच्च न्यायालयाकडून परवानगी मिळाल्यानंतर विनेश शनिवारी आशियाई क्रीडा स्पर्धेच्या निवड चाचणीत सहभागी झाली.
विनेश फोगट आशियाई स्पर्धे तून बाहेर; निवड चाचणीत मीनाक्षीकडून पराभव (लोकसत्ता टिम)
वृत्तसंस्था, नवी दिल्ली
विनेश फोगटचे आंतरराष्ट्रीय कुस्तीतील पुनरागमन लांबणीवर पडले आहे. उच्च आणि सर्वोच्च न्यायालयाकडून परवानगी मिळाल्यानंतर विनेश शनिवारी आशियाई क्रीडा स्पर्धेच्या निवड चाचणीत सहभागी झाली.
मात्र, ५३ किलो वजनी गटात सुरुवातीच्या झुंजीनंतर उपांत्य फेरीत तिला मीनाक्षी गोयतकडून ४–६ असा पराभव पत्करावा लागला.
पॅरिस ऑलिम्पिकमधील कटू अनुभवानंतर राष्ट्रीय संघात पुन्हा स्थान मिळवण्याच्या विनेशच्या प्रयत्नांना यश मिळाले नाही. ''मी अपयशी ठरले असे मला वाटत नाही. मी संपूर्ण व्यवस्थेविरुद्ध लढत होते. प्रत्येक पायरीवर मला संघर्ष करावा लागला. मला योग्य वागणूक मिळाली नाही. अर्थात, माझ्याशी लढलेल्या खेळाडूंबद्दल माझ्या मनात कोणताही आकस नाही. निवड चाचणीत हार पत्करावी लागली असली, तरी मी पुन्हा



जोरदार पुनरागमन करेन,'' असे विनेशने क्रीडा संकुल सोडण्यापूर्वी सांगितले.
नाट्यमय सुरुवात
पॅरिस ऑलिम्पिकच्या अंतिम लढतीतील दुर्दैवी अपात्रतेनंतर विनेश पहिल्यांदाच मॅटवर परतली होती. मात्र, दिवसाची सुरुवातच तिच्यासाठी नाट्यमय झाली होती. अधिकृत वजन मोजणीदरम्यान विनेशला सुरुवातीला ५० किलो वजनी गटातच खेळण्याची परवानगी देण्यात आली. याच गटात तिने पॅरिस ऑलिम्पिकसह तिच्या शेवटच्या चार आंतरराष्ट्रीय स्पर्धा खेळल्या होत्या. यावर विनेशने तीव्र आक्षेप घेतला आणि भारतीय कुस्ती महासंघावर भेदभावाचा आरोप केला. यानंतर महासंघाचे अध्यक्ष संजय सिंह यांनी मध्यस्थी करत तिला ५३ किलो वजनी गटाच्या चाचणीत भाग घेण्याची परवानगी दिली. वजन मोजणीत ५३.९ किलो वजन भरल्यानंतर विनेशचा गटात समावेश करण्यात आला.
विनेशने पहिल्या सामन्यात ज्योतीवर ७–१ असा सहज विजय मिळवून आपल्या मोहिमेची सुरुवात केली. त्यानंतर, उपांत्यपूर्व फेरीत अत्यंत आक्रमक आणि तंत्रकुशल निशू कुमारीविरुद्ध शेवटी ६–६ अशा बरोबरीला विनेशला निर्णायक गुण मिळाला आणि तिने हा सामना ७–६ असा जिंकला.
विनेशची दमछाक
या भावनिक आणि थकवणाऱ्या सामन्याचा विनेशवर परिणाम झाला. गेल्या काही महिन्यांत ती स्पर्धात्मक कुस्तीपासून दूर असल्याचाही फटका तिला बसला. उपांत्य फेरीत मीनाक्षीविरुद्ध खेळताना तिला तोच वेग आणि आक्रमकता राखता आली नाही. अखेर ती ४–६ अशी पराभूत झाली. मीनाक्षीने अत्यंत संयमाने कुस्ती करताना दमलेल्या विनेशची अधिक दम छाक केली आणि बचाव भक्कम ठेवत विजय मिळवला.

## वेळचा चॅम्पियन जोकोविचचा धक्कादायक दारून पराभव!

### १९ वर्षीय फोन्सेकाने रचला इतिहास

नवी दिल्ली : फ्रेंच ओपन २०२६ मध्ये मोठा उलटफेर पाहायला मिळाला आहे. २४ वेळा ग्रँडस्लॅम विजेता याचा तिसऱ्या फेरीत १९ वर्षीय ब्राझिलियन स्टार जोआओ फोन्सेक (गेरे ऋीशलर) याने थरारक सामन्यात पराभव केला आहे. यामुळे क्रिडाविश्वात एकच खळबळ उडाली आहे. सुमारे पाच तास चाललेल्या या लढतीत फोन्सेकाने दोन सेट पिछाडीवरून दमदार पुनरागमन केले आणि जोकोविचला ४–६, ४–६, ६–३, ७–५, ७–५ अशा फरकाने पराभूत केले आहे. या विजयासह फोन्सेकाने टेनिसविश्वात मोठी खळबळ उडवून दिली आहे.



सामन्यादरम्यान ३९ वर्षीय जोकोविच उष्णतेमुळे त्रस्त दिसत होते. अनेकदा त्यांना आईस पॅकचा वापर करावा लागला. एका क्षणी ते कॅमेरामनवरही संतापला आणि कॅमेरा मागे घेण्यास सांगितले.
दोन सेट जिंकल्यानंतरही जोकोविचला विजय मिळवता आला नाही. चौथ्या सेटमध्ये पराभवाच्या उंबरठ्यावर असताना फोन्सेकाने जबरदस्त खेळ दाखवत सामना निर्णायक सेटपर्यंत नेला होता. अखेरीस सलग तीन ऐस मारत त्याने आपल्या करियरमधील सर्वात मोठा विजय साजरा केला. या विजयासह फोन्सेका ग्रँडस्लॅम स्पर्धेत जोकोविचला पराभूत करणारा पहिला तरुण खेळाडू ठरला आहे. तसेच रोलँड गॅरोसमध्ये दोन सेट पिछाडीवरून जोकोविचला हरवणारा इतिहासातील दुसरा खेळाडू बनला आहे.सामन्यानंतर भावूक फोन्सेकाने सांगितले, जोकोविच माझा आदर्श आहे. त्यांच्याविरुद्ध खेळणे आणि विजय मिळवणे हा माझ्या करियरमधील सर्वात खास क्षण आहे. टेनिसविश्वातील या मोठ्या धक्क्यामुळे फ्रेंच ओपनच्या विजेतेपदाच्या शर्यतीत आता नवे समीकरण तयार झाले आहे.

## एका कॅचने फिरवला सामना; राजस्थानच्या हातून निसटली आयपीएल फायनलची संधी!

मुंबई : आयपीएल २०२६ च्या (खझङ २०२६) दुसऱ्या क्वालिफायरमध्ये (टींरश्रळषळशी) गुजरात टायटन्सने (ऋढ) राजस्थान रॉयल्सचा (ठठ) ७ विकेट्स राखून पराभव करत थेट अंतिम फेरीत धडक मारली. मुल्लानपूर येथे झालेल्या या रोमांचक सामन्यात राजस्थानने प्रथम फलंदाजी करताना २० षटकांत २१४ धावांचा मोठा डोंगर उभा केला होता. मात्र गुजरातच्या फलंदाजांनी (इरींाशप) दमदार कामगिरी करत हे आव्हान सहज पार केले आणि फायनलचे (ऋळ- परश्र) तिकीट निश्चित केले.२१५ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना गुजरात टायटन्सला कर्णधार शुभमन गिल (उरीरिंळप डर्हीलहारप ऋळश्रश्र) आणि साई सुदर्शन यांनी जबरदस्त सुरुवात करून दिली. दोघांनी राजस्थानच्या गोलंदाजांचा समाचार घेत पहिल्या विकेटसाठी तब्बल १६७ धावांची भागीदारी रचली. साई सुदर्शन ५८ धावांवर बाद झाला, तर शुभमन गिलने ५३ चेंडूत १०४ धावांची तुफानी शतकी खेळी साकारली. या दोन्ही फलंदाजांच्या खेळीमुळे गुजरातचा विजय जवळपास निश्चित झाला होता.मुंबई : देखभाल दुरुस्तीच्या कामांसाठी रेल्वे रविवार ३१ मे २०२६ रोजी मेगाब्लॉक घेणार आहे. प्रवाशांनी मेगाब्लॉकचे वेळापत्रक जाणून घेऊन प्रवासाचे सलामीवीर बाद झाल्यानंतर जोस बटलर आणि वॉशिंग्टन सुंदर मैदानात उतरले.

## अभिमानास्पद! एअर पिस्तूल प्रकारात सुरुचीला सुवर्ण तर ईशाला रौप्यपदक




नवी मुंबई–जर्मनीतील म्युनिक येथे झालेल्या आयएसएसएफ विश्वचषक २०२६ मध्ये भारताने महिलांच्या १० मीटर एअर पिस्तूल प्रकारात पहिले आणि दुसरे स्थान पटकावले आहे. सुरुची सिंग आणि ईशा सिंग यांनी अनुक्रमे सुवर्ण आणि रौप्य पदके जिंकले. गेल्या हंगामात तीन वैयक्तिक आयएसएसएफ विश्वचषक सुवर्णपदके जिंकणाऱ्या सुरुची सिंगने अंतिम टप्प्यात शानदार कामगिरी करत २४२.१ गुणांसह अव्वल स्थान पटकावले.गेल्या वर्षी दोहा येथे झालेल्या आयएसएसएफ विश्वचषक अंतिम फेरीत जिंकलेल्या सुवर्णपदकासह, सुरुची सिंगचे हे सातवे आयएसएसएफ विश्वचषक पदक आहे.सुवर्णपदकामुळे या २० वर्षीय भारतीय नेमबाजाने डिसेंबरमध्ये इटलीतील रोम येथे होणाऱ्या या वर्षीच्या आयएसएसएफ विश्वचषक अंतिम फेरीसाठी थेट पात्रता मिळवली आहे. ईशा सिंगने २४१.२ गुणांसह रौप्य पदक जिंकले, ती तिच्या देशबांधवापेक्षा एका गुणापेक्षा कमी फरकाने मागे राहिली.विद्यमान आशियाई चॅम्पियनने म्युनिकमध्ये आपली प्रभावी कामगिरी सुरूच ठेवली, यापूर्वी तिने महिलांच्या २५ मीटर पिस्तूल प्रकारात विश्वविक्रमी गुणांसह विजेतेपद पटकावले होते.दक्षिण कोरियाच्या चू गाऊनने २२०.२ गुणांसह कांस्य पदक जिंकले.अंतिम फेरीत लंडन २०१२ ची रौप्य पदक विजेती फ्रान्सची सेलीन गोबरविल हिचाही समावेश होता, जी १५८.६ गुणांसह सहाव्या स्थानावर राहिली.


भारताची मुस्कान पात्रता फेरीत ५७९-१६ु गुणांसह सहाव्या स्थानावर राहिली, परंतु ती केवळ रँकिंग गुणांवरच स्पर्धा करत होती. सुरुची आणि ईशा अनुक्रमे आठव्या आणि नवव्या स्थानावर ५७८ गुणांसह पात्र ठरल्या.दरम्यान, मनू भाकर ५७५-१७ु गुणांसह २० व्या स्थानावर राहिली आणि म्युनिकमध्ये सलग दुसऱ्यांदा अंतिम फेरीत पोहोचू शकली नाही. ती आता १० मीटर एअर पिस्तूल मिश्र सांघिक प्रकारात स्पर्धा करेल. दुसरी भारतीय नेमबाज, अंजली शेखावत, आरपीओ अंतर्गत ५५९-११ु गुणांसह ९३ व्या स्थानावर राहिली.

पुरुषांच्या २५ मीटर रॅपिड फायर पिस्तूल अंतिम फेरीसाठी एकही भारतीय नेमबाज पात्र ठरला नाही.अनिश भानवाला ५७७ गुणांसह २८ व्या स्थानावर राहिला, तर उदयवीर सिंग आणि सूरज शर्मा ५७४ गुणांसह अनुक्रमे ३७ व्या आणि ३९ व्या स्थानावर राहिले.पुरुषांच्या ५० मीटर रायफल ३ पोझिशन्स पात्रता फेरीत, एड्रियन कर्माकर आरपीओ स्थितीनुसार ५८५-३२ु गुणांसह ५० व्या स्थानावर राहिला. त्याने गुडघ्यावर बसून १९७ गुण, पोटावर झोपून २०० गुण आणि उभे राहून १८८ गुण मिळवले. रुद्रांश पाटील ५८५-२८ु गुणांसह ५३ व्या स्थानावर राहिला. त्याने गुडघ्यावर बसून १९५ गुण, पोटावर झोपून १९६ गुण आणि उभे राहून १९४ गुण मिळवले. ऐश्वर्या प्रताप सिंह तोमरला त्याच्या उपकरणातील तांत्रिक बिघाडामुळे अपात्र ठरवण्यात आले.

## बलाढ्य बंगळूरु विरुद्ध जिद्दी गुजरात अहमदाबादमध्ये आज आयपीएलचा महासंग्राम

मुंबई : क्रिकेट जगतातील सर्वात श्रीमंत आणि लोकप्रिय लीग म्हणजेच 'इंडियन प्रीमियर लीग २०२६' ता अंतिम टप्प्यात पोहोचली आहे. रविवारी अहमदाबादच्या ऐतिहासिक नरेंद्र मोदी स्टेडियमवर क्रिकेटचा महासंग्राम आहे. गतविजेता रॉयल चॅलेंजर्स बंगळूरु आणि २०२२ चा चॅम्पियन गुजरात टायटन्स यांच्यात यंदाच्या ट्रॉफीसाठी थरारक संघर्ष पाहायला मिळेल. एका बाजूला बंगळूरुची आक्रमक फलंदाजी, तर दुसऱ्या बाजूला गुजरातची जिद्दी रणनीती; यामुळे हा सामना क्रिकेटप्रेमींसाठी पर्वणी ठरणार आहे.बंगळूरुचा संघ यंदाच्या हंगामात अत्यंत निर्भय आणि आक्रमक क्रिकेट खेळण्यासाठी ओळखला गेला आहे. विराट कोहली, देवदत्त पडिक्कल, टिम डेव्हिड, फिल सॉल्ट आणि वेंकटेश अय्यर यांसारख्या स्फोटक फलंदाजांच्या जोरावर आरसीबीने यंदा अनेकदा २०० धावांचा टप्पा सहज पार केला आहे. खेळपट्टी कशीही असो, पहिल्या चेंडूपासून हल्ला चढवणे हीच आरसीबीची मुख्य ताकद आहे. दुसरीकडे, कर्णधार रजत पाटीदार याने संघाला कमालीचे स्थैर्य दिले आहे. विराट कोहलीप्रमाणे आक्रमक नेतृत्वशैली नसली, तरी पाटीदारच्या शांत आणि संयमी स्वभावामुळे युवा खेळाडूंना मैदानावर सर्वोत्तम कामगिरी करण्याचा आत्मविश्वास मिळाला आहे. दरम्यान घरच्या मैदानावर खेळणाऱ्या गुजरात टायटन्सला कमी लेखण्याची चूक आरसीबी करणार नाही. गुजरातचा प्रेरणादायी कर्णधार शुभमन गिल सध्या कारकिर्दीतील सर्वोत्तम फॉर्ममध्ये आहे. दुसऱ्या क्वालिफायर सामन्यात राजस्थान रॉयल्सविरुद्ध एकहाती झंझावाती शतक झळकावून त्याने संघाला फायनलचे तिकीट मिळवून दिले. त्यातच अहमदाबादचे मैदान हे गिलचे आवडते मैदान मानले जाते. दबावाच्या क्षणी इतिहास रचण्याचा गिलचा आयपीएल प्लेऑफमधील रेकॉर्ड पाहता, गुजरात संघाला त्याच्याकडून पुन्हा एकदा 'फायनल' कामगिरीची अपेक्षा असेल. आरसीबी आपले जेतेपद राखण्यात यशस्वी ठरणार की शुभमन गिलचा गुजरात संघ घरच्या मैदानावर आरसीबीचे स्वप्न भंग करणार? याकडे संपूर्ण जगाचे लक्ष लागले आहे. एक लाखाहून अधिक प्रेक्षकांच्या उपस्थितीत आज रात्री आयपीएल २०२६ चा नवा राजा मिळणार आहे.

गुजरातची मदार अव्वल फळीवर
दुसरीकडे गुजरात टायटन्सची सर्वाधिक ताकद म्हणजे त्यांची अव्वल फलंदाजी. कर्णधार शुभमन गिल, साई सुदर्शन आणि जोस बटलर या त्रिकुटाने संपूर्ण स्पर्धेत संघाचा डाव सांभाळला आहे. गिलने ७२२ धावा, सुदर्शनने ७१० धावा तर बटलरने ५०७ धावा करत गुजरातला अंतिम फेरीपर्यंत पोहोचवण्यात मोलाचा वाटा उचलला आहे. गुजरातचा मधला फळा तुलनेने कमकुवत मानला जात असल्याने अंतिम सामन्यातही संघाची मोठी जबाबदारी या तिघांवर असणार आहे. अहमदाबादमधील सात सामन्यांपैकी पाच विजय मिळवल्यामुळे घरच्या मैदानावरील यश गुजरातसाठी आत्मविश्वास वाढवणारे ठरू शकते. गोलंदाजांमधील संघर्ष ठरणार निर्णायक बंगळूरुच्या विजयामागे त्यांच्या





गोलंदाजांचाही मोठा वाटा आहे. भुवनेश्वर कुमार, जोश हेझलवूड, रासिख सलाम आणि कृणाल पंड्या यांनी प्रतिस्पर्धी संघांना सुरुवातीच्या षटकांतच रोखून धरले आहे. विशेषतः भुवनेश्वर कुमारने २६ बळी घेत जांभळ्या टोपीच्या शर्यतीत अव्वल क्रमांकावर असलेल्या गोलंदाजांना कडवी टक्कर दिली आहे. मात्र गुजरातकडेही कागिसो रबाडा, मोहम्मद सिराज, राशिद खान, जेसन होल्डर आणि प्रसिद्ध कृष्णा यांसारखी तगडी गोलंदाजी फळी आहे. २८ बळींसह रबाडा सध्या सर्वाधिक बळी घेणारा गोलंदाज आहे. सिराज आणि रबाडा यांनी प्रतिस्पर्धी फलंदाजांवर दबाव निर्माण करत मोठ्या प्रमाणात निर्धाव चेंडू टाकले आहेत. सिराजच्या तंदुरुस्तीवर लक्ष राजस्थानविरुद्धच्या पात्रता फेरीतील सामन्यात मोहम्मद सिराजला खांद्याची किरकोळ दुखापत झाली होती. त्याने पूर्ण चार षटके टाकली असली तरी त्याला काहीसा त्रास जाणवत होता. अंतिम सामन्यापूर्वी त्याच्या तंदुरुस्तीवर गुजरात व्यवस्थापनाचे विशेष लक्ष असेल. बंगळरुचे पारडे जड

दोन्ही संघांमधील एकूण नऊ सामन्यांपैकी बंगळूरुने पाच सामने जिंकले आहेत. यंदाच्या हंगामात झालेल्या तीन लढतींपैकी दोन सामन्यांत बंगळुरूने विजय मिळवला आहे. विशेष म्हणजे पात्रता फेरीत बंगळूरुने गुजरातचा तब्बल ९२ धावांनी पराभव केला होता. त्यामुळे अंतिम सामन्यात बंगळूरु आत्मविश्वासाने मैदानात उतरणार आहे.

फलंदाजांसाठी पोषक खेळपट्टी
नरेंद्र मोदी स्टेडियमची खेळपट्टी फलंदाजांसाठी अनुकूल मानली जात आहे. त्यामुळे दोन्ही संघांच्या फलंदाजांकडून धावांचा पाऊस पडण्याची शक्यता आहे. २०० पेक्षा अधिक धावांचा डाव उभारला जाण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे. रात्री दव पडण्याची शक्यता असल्याने नाणेफेक जिंकणारा संघ प्रथम गोलंदाजी करण्यास प्राधान्य देऊ शकतो.

ई साला नू कप नम्दे?
रॉयल चॅलेंजर्स बंगळूरुला सलग दुसरे आयपीएल विजेतपद जिंकण्याची सुवर्णसंधी आहे. जर बंगळुरूने हा सामना जिंकला तर ते सलग दोन हंगामांत विजेतेपद मिळवणाऱ्या संघांच्या यादीत स्थान मिळवतील. मात्र गुजरात टायटन्ससारख्या संतुलित आणि लढाऊ संघाला कमी लेखणे धोकादायक ठरू शकते.

हेड-टू-हेड टी-२० रेकॉर्ड (सामने आणि आकडेवारी)
एकूण खेळलेले सामने: ०९ आरसीबीने जिंकलेले सामने: ०५ जीटीने जिंकलेले सामने: ०४ टाय/अनिर्णित : ०० पहिला वहिला सामना: ३० एप्रिल २०२२ (जीटी विजयी) सर्वात अलीकडील सामना: २६ मे २०२६ (आरसीबी विजयी)

सामना कोणाच्या बाजूने?
कागदावर पाहता आरसीबी अधिक संतुलित आणि आत्मविश्वासपूर्ण संघ वाटतो. त्यांच्याकडे फलंदाजीची खोली, अनुभवी गोलंदाज आणि अंतिम सामन्याचा अनुभव आहे. गुजरातकडे उत्कृष्ट गोलंदाजी आणि दमदार सलामी जोडी असली तरी मधल्या फळीतील कमकुवतपणा त्यांच्यासाठी अडचणीचा ठरू शकतो. आरसीबीचा विजयाचा दावा अधिक मजबूत दिसत असला, तरी शुभमन गिल, साई सुदर्शन आणि राशिद खान यांचा एक उत्कृष्ट दिवस गुजरातला दुसरे विजेतेपद मिळवून देऊ शकतो. त्यामुळे हा अंतिम सामना रोमांचक आणि चुरशीचा होण्याची चिन्हे आहेत. संभाव्य निकाल : आरसीबी ५५%, गुजरात ४५%.दोन्ही संभाव्य संघ गुजरात टायटन्स सुदर्शन (सलामीवीर) शुभमन गिल (कर्णधार / सलामीवीर) जॉस बटलर (यष्टिरक्षक ) वाशिंग्टन सुंदर (ऑलराउंडर) निशांत सिंधू (ऑलराउंडर) जेसन होल्डर (ऑलराउंडर) रशीद खान (फिरकीपटू ) कागिसो रबाडा (वेगवान गोलंदाज) आर. साई किशोर (फिरकीपटू) मोहम्मद सिराज (वेगवान गोलंदाज) प्रसिद्ध कृष्णा (वेगवान गोलंदाज) रॉयल चॅलेंजर्स बंगळूरु व्यंकटेश अय्यर (सलामीवीर) विराट कोहली (सलामीवीर/फलंदाज) देवदत्त पडिक्कल (फलंदाज) रजत पाटीदार (कर्णधार) जितेश शर्मा (यष्टिरक्षक) टिम डेव्हिड (फिनिशर) कृणाल पंड्या (ऑलराउंडर) भुवनेश्वर कुमार (वेगवान गोलंदाज) जेकब डफी (वेगवान गोलंदाज ) जोश हेझलवूड (वेगवान गोलंदाज) रसिख सलाम दार (वेगवान गोलंदाज) टॉसची भूमिका संध्याकाळी दव पडण्याची शक्यता असल्याने, टॉस जिंकणारा कर्णधार आधी गोलंदाजी करण्याचा निर्णय घेऊ शकतो.

## टिकेकरवाडी यार्ड उन्नतीकरणामुळे सोलापूर विभागातील रेल्वे वाहतुकीवर परिणाम; काही गाड्या वळविल्या, काही उशिराने धावणार

**सोलापूर/प्रतिनिधी:** मध्य रेल्वेच्या सोलापूर विभागांतर्गत टिकेकरवाडी यार्ड येथे उन्नतीकरणाच्या पूर्वतयारीच्या कामासाठी दिनांक २९ मे ते ४ जून २०२६ दरम्यान वाहतूक ब्लॉक घेण्यात येणार असून, यामुळे सोलापूर विभागातून धावणाऱ्या काही रेल्वे गाड्यांच्या वाहतुकीवर परिणाम होणार आहे. काही गाड्या पर्यायी मार्गाने चालविण्यात येणार असून काही गाड्यांचे नियमन (रेग्युलेशन) करण्यात येणार असल्याची माहिती रेल्वे प्रशासनाने दिली आहे.

**काही गाड्या पर्यायी मार्गाने धावणार:**

रेल्वे प्रशासनाने दिलेल्या माहितीनुसार, गाडी क्रमांक ५७६६२ विजयपूर–रायचूर पॅसेंजर ही गाडी ३१ मे, १ जून आणि २ जून २०२६ रोजी विजयपूर–होटगी–वाडी या मार्गाने वळविण्यात येणार आहे. त्यामुळे होटगी–सोलापूर–होटगी या दरम्यान सेवा उपलब्ध राहणार नाही.

तसेच गाडी क्रमांक ५७६६१ रायचूर–विजयपूर पॅसेंजर ही गाडीही ३१ मे, १ जून आणि २ जून २०२६ रोजी वाडी–होटगी–विजयपूर या पर्यायी मार्गाने धावणार असून होटगी–सोलापूर–होटगी या मार्गावर सेवा बंद राहील.

**काही गाड्या उशिराने धावणार:**

गाडी क्रमांक १८५२० लोकमान्य टिळक टर्मिनस (एलटीटी) मुंबई–विशाखापट्टणम एक्स्प्रेस ही गाडी ३१ मे २०२६ रोजी १ तास, तर १ व २ जून रोजी १ तास ४० मिनिटे नियंत्रित करण्यात येणार आहे.

गाडी क्रमांक ०१४६५ सोलापूर–कलबुर्गी विशेष गाडी ही ३१ मे रोजी २० मिनिटे, तर १ व २ जून रोजी ३० मिनिटे उशिराने धावणार आहे.

याशिवाय गाडी क्रमांक ११३११ सोलापूर–हासन एक्स्प्रेस ही ३ व ४ जून रोजी १५ मिनिटे, तर गाडी क्रमांक १७३०८ बागलकोट–म्हैसूर बसवा एक्स्प्रेस ही ३ व ४ जून रोजी १० मिनिटे नियंत्रित करण्यात येणार आहे.

रेल्वे प्रशासनाने सांगितले की, पायाभूत सुविधा उन्नतीकरण आणि सुरक्षिततेच्या दृष्टीने हे वाहतूक ब्लॉक आवश्यक आहेत. त्यामुळे प्रवाशांनी होणाऱ्या गैरसोयीबाबत सहकार्य करावे तसेच रेल्वे प्रवासाचे नियोजन करताना या बदलांची नोंद घ्यावी, असे आवाहन सोलापूर विभागाकडून करण्यात आले आहे.

## जिल्ह्यातील अधिग्रहणांनी शंभरी ओलांडली

**लातूर/प्रतिनिधी:** लातूर जिल्ह्यात उन्हाळयाची तीव्रता वाढत असल्याच्या पार्श्वभूमीवर ग्रामीण पाणी पुरवठा विभाग, जिल्हा परिषद, लातूर यांच्या वतीने पाणी टंचाईवर मात करण्यासाठी विविध उपाययोजना युद्धपातळीवर राबवल्या जात आहेत. ग्रामीण भागातील नागरिकांना पिण्याच्या पाण्याची कमतरता भासू नये, यासाठी प्रशासनाकडून आज घडीला २ टँकरद्वारे पाणीपुरवठा आणि १०३ खाजगी विहिरींचे अधिग्रहण करण्यात आले आहे. लातूर जिल्ह्यात तापमानाचा पारा ४० अंश सेल्सीअसच्या वर कायम आहे. जिल्हयातील नद्या, ओढे, नाल्या कारडया पडत चालल्या आहेत. त्यामुळे पाण्याचे स्त्रोत बंद होऊन पाणी टंचाईचे संकट जाणवत आहे. ग्रामीण भागातील नागरीकांचे पिण्याच्या पाण्यासाठी हाल होत आहेत. जिल्ह्यातील १२७ गावे, ३६ वाडया, तांडयावर १९८ अधिग्रहणाची मागणी ग्रामपंचायतींकडे केली आहे.

**८४ गावे, वाडयांना अधिग्रहणाद्वारे पाणीपुरवठा**

ग्रामीण भागातील गावांमध्ये पाण्याची टंचाई दूर करण्यासाठी मोठया प्रमाणावर खाजगी विहिरींचे अधिग्रहण करण्यात येत आहे. जिल्ह्यातील ८४ गावे, तांडे, वाड्यांसाठी १०३ विहिरी किंवा विंधन विहिरी अधिग्रहित करण्यात आल्या आहेत. यात औसा तालुक्यात २४ गावांमध्ये ३१ विहिरींचे अधिग्रहण करण्यात आले आहे, तर अहमदपूर तालुक्यात २५ गावे व वाड्यांमध्ये ३० विहिरी, उदगीर तालुक्यात १० गावांमध्ये ११ विहिरी, निलंगा तालुक्यात ७ गावांमध्ये १० विहिरी, जळकोट तालुक्यात ८ गावांमध्ये ९ विहिरी, चाकूर तालुक्यात ५ गावांमध्ये ५ विहिरी, रेणापूर तालुक्यात ३ गावांमध्ये ३ विहिरी, देवणी तालुक्यातील १ गावासाठी ३ विहिरी, लातूर तालुक्यात १ गावात १ विहिरीचे अधिग्रहण करण्यात आले आहे.

**३३१० नागरिकांना दिलासा**

आज घडीला जळकोट तालुक्यामध्ये तीव्र पाणी टंचाई जाणवत असल्यामुळे तिथे टँकरद्वारे पाणीपुरवठा सुरू करण्यात आला आहे. जळकोट तालुक्यातील २ गावे आणि १ वाडी अशा ३ ठिकाणी टँकरद्वारे पाणी पुरवले जात असल्यामुळे सुमारे ३,३१० नागरिकांना मोठा दिलासा मिळाला आहे. यासाठी शासनाचे २ टँकर कार्यरत असून त्यांच्या दररोज ४ फे–या मंजूर करण्यात आल्या आहेत. या सर्व फे–या यशस्वीरित्या पूर्ण केल्या जात आहेत. प्रामुख्याने जळकोट तालुक्यातील शिवाजी नगर तांडा, वाघमारी तांडा आणि गव्हाण येथे टँकर मंजूर करण्यात आले आहेत.

# 'सिंगल विंडो क्लिअरन्स' व्यवस्थेमुळे 'लाईव्ह इव्हेंट्स' संदर्भातील परवानगी प्रक्रिया गतिमान होणार

**प्रधान सचिव तथा महासंचालक ब्रिजेश सिंह**

**मुंबई/प्रतिनिधी :** राज्यातील लाईव्ह इव्हेंट, कॉन्सर्ट, सांस्कृतिक कार्यक्रम आणि महोत्सवांच्या आयोजनासाठी कमी कालावधीत आणि सुलभरित्या परवानग्या मिळण्यासाठी 'सिंगल विंडो क्लिअरन्स' प्रणाली माहिती व जनसंपर्क महासंचालनालयामार्फत विकसित करण्यात येत आहे. या प्रणालीमुळे लाईव्ह इव्हेंट क्षेत्राच्या कार्यप्रणाली प्रक्रिया निश्चित गतिमान होणार आहे, असा विश्वास माहिती जनसंपर्क महासंचालनालयाचे प्रधान सचिव तथा महासंचालक ब्रिजेश सिंह यांनी व्यक्त केला.

मंत्रालयातील परिषद सभागृहात लाईव्ह इव्हेंटस क्षेत्रातील विविध संस्था प्रतिनिधींसमवेत आयोजित बैठकीत प्रधान सचिव तथा महासंचालक सिंह बोलत होते.

या बैठकीस सामान्य प्रशासन विभागाच्या उपसचिव समृद्धी अनगोळकर, माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाचे संचालक (प्रशासन) किशोर गांगुर्डे, संचालक (माहिती) गोविंद अहंकारी तसेच लाईव्ह इव्हेंट आयोजित करणाऱ्या संस्थांचे प्रतिनिधी ईव्हीए लाईव्हचे संचालक विनोद जनार्धन, लक्ष मिडिया ग्रुपचे सिईओ शाजू इग्नाथस, मिडास नेक्स्ट मिडियाचे संस्थापक व महाव्यवस्थापक दीपक पवार, ईईएमएचे सचिव अंकुर कालरा, बीएमएस लाइव्हचे उप महाव्यवस्थापक स्वप्नील माने,





थिएटर प्रोड्यूसर अश्विन गिडवाणी, यूनडीपी इंडियाच्या संचालिका कविता सचवानी, बुकमायशोचे अनिल माखिजा, साहिल कुलंगरा, हर्षल कोठारी आदी उपस्थित होते.

प्रधान सचिव ब्रिजेश सिंह म्हणाले की, राज्यातील लाईव्ह इव्हेंट क्षेत्राची आर्थिक, सांस्कृतिक आणि पर्यटनविषयक प्रचंड क्षमता आहे. या क्षेत्राच्या विकासासाठी शासन सकारात्मक भूमिका घेत आहे. सध्या कार्यक्रम आयोजनासाठी विविध विभागांकडून स्वतंत्र परवानग्या घ्याव्या लागत असल्याने आयोजकांना अनेक अडचणींना सामोरे जावे लागते. शिवाय यामध्ये बराच कालवधी लागतो. या प्रक्रियेत सुसूत्रता आणण्यासाठी आणि कालबद्ध पद्धतीने परवानग्या उपलब्ध करून देण्यासाठी सिंगल विंडो प्रणाली विकसित करण्यात येत आहे. महाराष्ट्रासाठी लाईव्ह इव्हेंट्सच्या परवानगी घेण्यासाठी प्रमाणित कार्यपद्धती (एसओपी) तयार करण्यात येणार असून, याधारे लाईव्ह इव्हेंट्चे कार्यक्रम आयोजन करणाऱ्यांना सर्व आवश्यक परवानग्या एकाच ठिकाणी उपलब्ध करून देण्याचे नियोजन आहे.

लाईव्ह इव्हेंट उद्योगासाठी प्रशिक्षित मनुष्यबळ तयार करण्यासाठी शैक्षणिक संस्था, उद्योग क्षेत्र आणि शासन यांच्यात समन्वय करण्यात येणार आहे. कौशल्य विकास, विशेष प्रशिक्षण कार्यक्रम आणि युवकांसाठी रोजगाराच्या नव्या संधी निर्माण करण्यासाठी संयुक्त प्रयत्न करण्यात येणार आहेत. उद्योग क्षेत्राकडून प्राप्त झालेल्या सूचना आणि शिफारशींचा विचार करून महाराष्ट्रासाठी प्रभावी, पारदर्शक आणि उद्योगपूरक कार्यपद्धती विकसित करताना प्रशिक्षित मनुष्यबळ तयार करण्यावर भर असेल. लाईव्ह इव्हेंट क्षेत्राला चालना मिळण्याबरोबरच पर्यटन, गुंतवणूक, रोजगारनिर्मिती आणि राज्याच्या अर्थव्यवस्थेलाही बळकटी मिळेल, असा विश्वास प्रधान सचिव तथा महासंचालक ब्रिजेश सिंह यांनी व्यक्त केला.

प्रधान सचिव ब्रिजेश सिंह म्हणाले की, लाईव्ह इव्हेंट क्षेत्राशी संबंधित विविध अडचणी दूर करून या उद्योगाला अधिक सक्षम, सुलभ आणि स्पर्धात्मक वातावरण उपलब्ध करून देणे हा शासनाचा प्रमुख उद्देश आहे. यासाठी परवानगी प्रक्रियेत सुसूत्रता आणून ती अधिक पारदर्शक, कालबद्ध आणि उद्योगपूरक करण्यात येणार आहे. या उपक्रमामुळे राज्यातील मनोरंजन उद्योगाला चालना मिळण्याबरोबरच पर्यटन, गुंतवणूक आणि रोजगारनिर्मितीच्या संधींमध्येही वाढ होईल. तसेच महाराष्ट्राला राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावरील मोठ्या कार्यक्रमांसाठी आकर्षक केंद्र म्हणून विकसित करण्यास मदत होईल, असेही ब्रिजेश सिंह यांनी यावेळी सांगितले.

या बैठकीत उद्योग प्रतिनिधींनी परवानगी प्रक्रियेतील अडचणी, विविध विभागांमधील समन्वय, गर्दी व्यवस्थापन, वाहतूक नियोजन, सुरक्षा मानके, पर्यावरणपूरक कार्यक्रमांचे आयोजन, कौशल्य विकास आणि तंत्रज्ञानाचा वापर यासंदर्भात विविध सूचना मांडल्या. बैठकीत महाराष्ट्रातील सांस्कृतिक, संगीत, खाद्य आणि पर्यटन महोत्सवांना राष्ट्रीय तसेच आंतरराष्ट्रीय स्तरावर प्रोत्साहन देण्यासाठी प्रभावी ब्रँडिंग, प्रायोजकत्व, महसूल निर्मिती आणि खासगी क्षेत्राच्या सहभागाबाबतही चर्चा झाली. पर्यावरणपूरक 'ग्रीन इव्हेंट्स', कचरा व्यवस्थापन, सार्वजनिक वाहतुकीचा वापर आणि कार्बन उत्सर्जन कमी करण्यासाठी उद्योग क्षेत्राने केलेल्या उपक्रमांची माहितीही यावेळी देण्यात आली.

# 'रोहयो'तील शून्य खर्चातील प्रलंबित असलेली ४०० कामे तातडीने पूर्ण करा: निलंगा पंचायत समितीत बैठक

**निलंगा/प्रतिनिधी :** तालुक्यात सध्या घरकुल बांधकामे, गोठे, विहिरी, फळबाग योजना, ग्रामीण रस्ते, बिहार पॅटर्न वृक्षलागवड, बांधावरील वृक्षलागवड आदी मिळून एकूण २४३६ कामे अपूर्ण असल्याची माहिती यावेळी देण्यात आली. यापैकी सुमारे ४०० कामे शून्य खर्चातील असल्याने ती तातडीने पूर्ण करण्याचे निर्देश देण्यात आले. उर्वरित सर्व प्रलंबित कामे ३० जूनपूर्वी पूर्ण करण्याचे आदेश संबंधित अधिकाऱ्यांना देण्यात आले.

केंद्र शासनाच्या महत्त्वाकांक्षी महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेच्या (मनरेगा) जागी आता विकसित भारत रोजगार जी–रामजी योजना सुरू होणार असल्याच्या पार्श्वभूमीवर निलंगा पंचायत समिती येथे मनरेगा विभागाची महत्त्वपूर्ण आढावा बैठक पार पडली. मनरेगा उपविभागीय अधिकारी एस. जी. माने यांच्या



मार्गदर्शनाखाली आयोजित करण्यात आलेल्या या बैठकीत तालुक्यातील प्रलंबित कामांचा सविस्तर आढावा घेण्यात आला. तसेच नवीन योजना प्रभावीपणे राबविण्यासंदर्भात विविध सूचना देण्यात आल्या.या बैठकीस गटविकास अधिकारी सतीश पाटील, सहाय्यक गटविकास अधिकारी दीक्षा पाटील यांची प्रमुख उपस्थिती होती.

म. गांधी रोजगार हमी योजनेचे नामांतर विकसीत भारत रोजगार जी–रामजी योजना असे होणार मनरेगा उपविभागीय अधिकारी एस. जी. माने यांनी सांगितले की, एक जुलैपासून विकसित भारत रोजगार जी–रामजी योजना प्रत्यक्षात सुरू होणार असून त्यासाठी आवश्यक पूर्वतयारी पूर्ण करणे अत्यावश्यक आहे. नवीन योजनेच्या अंमलबजावणीपूर्वी सर्व अपूर्ण कामे मार्गी लावून ग्रामपातळीवरील लाभार्थ्यांना दिलासा देण्यावर प्रशासनाचा भर असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.


## मुख्याध्यापकास दोन वर्षांची शिक्षा, ५ हजारांचा दंड

**निलंगा/प्रतिनिधी :** शासनाकडून शिक्षकांच्या वेतनासाठी प्राप्त झालेली जादा रक्कम शासनाकडे परत न करता स्वत:च्या खात्यात वळवून अपहार केल्याप्रकरणी निलंगा येथील प्रथम वर्ग न्यायदंडाधिका–यांनी मुख्याध्यापकास दोन वर्षांच्या कारावासाची तसेच ५ हजार रुपयांच्या दंडाची शिक्षा सुनावली आहे.या प्रकरणातील आरोपी मुद्दसिर खलील शेख हे गौसुल–उलूम उर्दू प्राथमिक शाळा, शिवाजीनगर, निलंगा येथे सन २०१० ते २०१३ या कालावधीत प्रभारी मुख्याध्यापक म्हणून कार्यरत होते. तपासात उघड झाल्यानुसार, शिक्षक व कर्मचा–यांच्या वेतन देयकांमध्ये शासनाकडून वेळोवेळी जादा आलेली रक्कम शिक्षणाधिकारी, लातूर व मुख्याध्यापकांच्या संयुक्त खात्यात जमा करण्यात आली होती. ही रक्कम सुमारे ८५ हजार ५०७ रुपये इतकी होती. आरोपींनी संबंधित रक्कम स्वत:च्या खात्यात वर्ग करून धनादेशाद्वारे काढून घेतल्याचे लेखापरीक्षणात स्पष्ट झाले. यानंतर आरोपीविरुद्ध निलंगा पोलीस ठाण्यात भारतीय दंड विधान कलम ४०९ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पोलीसांनी तपास पूर्ण करून न्यायालयात दोषारोपपत्र दाखल केले. सुनावणीदरम्यान सरकार पक्षातर्फे ४ साक्षीदार तपासण्यात आले. उपलब्ध पुरावे ग्रा धरत न्यायालयाने आरोपी मुद्दसिर खलील शेख यास दोषी ठरवून दोन वर्षांच्या कारावासासह ५ हजार रुपयांचा दंड ठोठावला. या प्रकरणी सरकार पक्षातर्फे सरकारी वकील अ‍ॅड. व्ही. एम. मेहेजे यांनी कामकाज पाहिले. त्यांना सहाय्यक सरकारी वकील अ‍ॅड. ए. एन. अनसरवाडकर यांनी सहकार्य केले.

# दयानंद इन्स्टिटयूट ऑफ फार्मसी, लातूर येथे एक दिवसीय ऑनलाइन एफडीपी कार्यक्रम संपन्न

**लातूर/प्रतिनिधी :** दयानंद शिक्षण संस्था संचलित दयानंद कॉलेज ऑफ फार्मसी व दयानंद इन्स्टिट्यूट ऑफ फार्मसी, लातूर यांच्या संयुक्त विद्यमाने औषधनिर्माण शिक्षण व संशोधनातील कृत्रिम बुद्धिमत्ता (AI) एकात्मिक परिवर्तनासाठी प्राध्यापकांची सज्जता या विषयावर फार्मसी क्षेत्रातील प्राध्यापकांसाठी एक दिवसीय ऑनलाइन संकाय विकास कार्यक्रम (Faculty Development Programme - FDP) उत्साहात संपन्न झाला.

कार्यक्रमाची सुरुवात महाविद्यालयाची माहिती देणाऱ्या चित्रफितीद्वारे करण्यात आली. पहिल्या सत्रात एमआयटी स्कूल ऑफ हेल्थ सायन्सेस अँड टेक्नॉलॉजी, पुणे येथील फार्मास्युटिक्स विभागाचे प्रमुख व सहप्राध्यापक डॉ. सतीश पोलशेट्टीवार




यांनी मार्गदर्शन केले. त्यांनी औषधनिर्माण शिक्षण, संशोधन, डेटा विश्लेषण, औषध शोध प्रक्रिया आणि विद्यार्थ्यांच्या मूल्यमापनामध्ये कृत्रिम बुद्धिमत्तेचा वाढता वापर अधोरेखित केला. फार्मसी कौन्सिल ऑफ इंडियाच्या नवीन अभ्यासक्रम २०२६ आणि राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० च्या अनुषंगाने एआय युगातील प्राध्यापकांसाठी आवश्यक कौशल्ये, क्षमता विकास, कौशल्यवृद्धी अभ्यासक्रम आणि मूल्यवर्धित कोर्सेस याविषयी त्यांनी सविस्तर माहिती दिली.

दुसऱ्या सत्रात अलाना कॉलेज ऑफ फार्मसी, पुणे येथील औषध रसायनशास्त्र विभागाचे प्रमुख डॉ. अन्वर शेख यांनी एआयच्या सहाय्याने संशोधनाची गुणवत्ता, अचूकता आणि गती कशी वाढविता येईल याविषयी मार्गदर्शन केले. त्यांनी विविध एआय टूल्सचा फार्मसी क्षेत्रातील उपयोग, शैक्षणिक व्हिडिओ निर्मिती, प्रतिमा तयार करणे तसेच संशोधन मूल्यमापनातील एआयच्या भूमिकेवर प्रकाश टाकला. एआयच्या प्रभावी वापरामुळे विद्यार्थ्यांना अधिक दर्जेदार शिक्षण मिळून संशोधनाला नवी दिशा मिळू शकते, असे मत त्यांनी व्यक्त केले.या ऑनलाइन एफडीपीला देशभरातील विविध महाविद्यालयांतील एकूण १८९ फार्मसी प्राध्यापकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

कार्यक्रमाच्या प्रास्ताविकात दयानंद इन्स्टिट्युट ऑफ फार्मसीचे प्राचार्य डॉ. वाजिद चाऊस यांनी संस्थेच्या स्थापनेपासून झालेल्या प्रगतीचा आढावा घेत नवीन तंत्रज्ञानाचा स्वीकार करून शिक्षणासोबत वैयक्तिक विकास साधण्याचे आवाहन केले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. श्रुती अंबड यांनी केले. प्रमुख अतिथी वक्त्यांचा परिचय प्रा. अरुण कोंडापुरे व डॉ. संग्राम देशमुख यांनी करून दिला. कार्यक्रमाच्या समन्वयकाची जबाबदारी प्रा. रोहित ऊसनाळे यांनी यशस्वीपणे पार पाडली. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनात प्रा. ओम पाटील यांनी तांत्रिक समन्वयक म्हणून मोलाचे योगदान दिले.

## सोलापूर–हासन एक्स्प्रेसला चन्नारायपटना स्थानकावर थांबा; 31 मेपासून अंमलबजावणी

**सोलापूर/प्रतिनिधी :** प्रवाशांच्या सोयीसाठी भारतीय रेल्वेने गाडी क्रमांक ११३११/११३१२ सोलापूर–हासन–सोलापूर एक्स्प्रेसला कर्नाटकातील चन्नारायपटना स्थानकावर प्रायोगिक तत्त्वावर थांबा देण्याचा निर्णय घेतला आहे. हा नवीन थांबा ३१ मे २०२६ पासून पुढील आदेशापर्यंत लागू राहणार असल्याची माहिती रेल्वे प्रशासनाने दिली आहे.




सुधारित वेळापत्रकानुसार, गाडी क्रमांक ११३११ सोलापूर–हासन एक्स्प्रेस चन्नारायपटना स्थानकावर सकाळी ९.२९ वाजता पोहोचेल व ९.३० वाजता पुढील प्रवासासाठी रवाना होईल. तसेच गाडी क्रमांक ११३१२ हासन–सोलापूर एक्स्प्रेस या स्थानकावर सायंकाळी ४.४९ वाजता दाखल होऊन ४.५० वाजता सुटणार आहे.

रेल्वे प्रशासनाने स्पष्ट केले की, नव्याने देण्यात आलेल्या या थांब्याव्यतिरिक्त गाडीच्या वेळापत्रकात अन्य कोणताही बदल करण्यात आलेला नाही.

चन्नारायपटना तसेच परिसरातील प्रवाशांना सोलापूर–हासन मार्गावरील महत्त्वाच्या ठिकाणांपर्यंत पोहोचण्यासाठी या निर्णयाचा लाभ होणार असून, प्रवास अधिक सुलभ होण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे. प्रवाशांच्या गरजा लक्षात घेऊन प्रादेशिक संपर्क अधिक मजबूत करण्याच्या रेल्वेच्या प्रयत्नांचा हा भाग असल्याचेही प्रशासनाने नमूद केले आहे.

प्रो. जडे यांचे रबरी शिक्के
कॉम्प्युटर नॉयलॉन रबर असलेले
टिकाऊ रबरी शिक्के
तयार करून मिळतील.




शाखा १.
जडे–भारत प्रिंटिंग प्रेस, मेनरोड, लातूर
शाखा २.
जडेऑफसेट प्रिंटर्स, मित्र नगर, लातूर
संपर्क: (०२३८२) २४२६०८,२४५४०९

# स्थानिक प्राधिकारी मतदारसंघ निवडणुक ६० कोरे अर्ज वितरित : आतापर्यंत दोन उमेदवारांकडून नामनिर्देशनपत्र दाखल

धाराशिव, (जिमाका) - महाराष्ट्र विधान परिषदेच्या स्थानिक प्राधिकारी मतदारसंघ निवडणुकीसाठी उस्मानाबाद - लातूर-बीड स्थानिक प्राधिकारी मतदारसंघात उमेदवारी अर्ज दाखल करण्याची प्रक्रिया सुरू असून आतापर्यंत ३२ व्यक्तींनी ६० कोरे नामनिर्देशनपत्रे प्राप्त केली आहेत. तर दोन उमेदवारांकडून नामनिर्देशनपत्र दाखल करण्यात आली असल्याची माहिती जिल्हा प्रशासनाने दिली.

भारत निवडणूक आयोगाने १८ मे २०२६ रोजी महाराष्ट्र विधान परिषदेच्या स्थानिक प्राधिकारी मतदारसंघाचा निवडणूक कार्यक्रम जाहीर केला आहे.त्यानुसार उस्मानाबाद-लातूर-बीड स्थानिक प्राधिकारी मतदारसंघाची निवडणूक सूचना २५ मे २०२६ रोजी प्रसिद्ध करण्यात आली.

२५ मे २०२६ पासून आजअखेर ३२ व्यक्तींनी जिल्हाधिकारी कार्यालयातून एकूण ६० कोरे नामनिर्देशनपत्रे घेतली आहेत.तसेच आजपर्यंत दोन उमेदवारांनी नामनिर्देशनपत्र दाखल केले आहेत.

दरम्यान,या निवडणुकीसाठी उमेदवारी अर्ज दाखल करण्यासाठी आता केवळ दोन दिवसांचा कालावधी शिल्लक राहिला आहे. शनिवार,३० मे २०२६ रोजी सकाळी ११ ते दुपारी ३ वाजेपर्यंत तसेच सोमवार,१ जून २०२६ रोजी सकाळी ११ ते दुपारी ३ वाजेपर्यंत नामनिर्देशनपत्र स्वीकारण्यात येणार आहेत. निवडणूक निर्णय अधिकारी तथा जिल्हाधिकारी धाराशिव यांच्या कार्यालयात ही प्रक्रिया पार पडणार असल्याचे सहायक निवडणूक निर्णय अधिकारी विदयाचरण कडवकर यांनी कळविले आहे.

# चुकीचे काम करणाऱ्यानो सावधान! आयुक्त तुकाराम मुंढे मैदानात; धाराशिवमध्ये भेसळ माफियांवर प्रशासनाचा मोठा होणार प्रहार

धाराशिव (रामेश्वर डोंगरे)- धाराशिव जिल्ह्यात आता भेसळखोरांचे धाबे दणाणले असून अन्न व औषध प्रशासनाचे आयुक्त तुकाराम मुंढे यांनी दोन नंबरच्या व्यवसायिकांविरोधात थेट मोहीम उघडणार असल्याचे वृत्त आहे. विशेषतः दूध, खवा, तूप, पनीर, मिठाई आणि दुग्धजन्य पदार्थांमध्ये होणारी भेसळ रोखण्यासाठी प्रशासनाने जिल्हाभर धडक कारवाई सुरू केली असून अनेक व्यापाऱ्यांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

येरमाळा येथे नुकत्याच झालेल्या धाडीत तब्बल २५२ किलो संशयित खवा जप्त करण्यात आला. या कारवाईमुळे संपूर्ण जिल्ह्यात खळबळ उडाली असून नागरिकांच्या आरोग्याशी खेळणाऱ्यांना आता प्रशासन सोडणार नसल्याचे स्पष्ट झाले आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, आयुक्त तुकाराम मुंढे यांच्या आदेशानुसार धाराशिव जिल्ह्यात विशेष भेसळविरोधी मोहीम सुरू करण्यात आली आहे. सणासुदीच्या काळात बाजारात नकली खवा, केमिकलयुक्त दूध, निकृष्ट तूप आणि बनावट मिठाई मोठ्या प्रमाणात विक्रीसाठी आणली जाते. यामुळे नागरिकांच्या आरोग्याला गंभीर धोका निर्माण होत असल्याने अन्न सुरक्षा विभाग आता पूर्णपणे ॲक्शन मोडमध्ये आला आहे.

अन्न सुरक्षा अधिकाऱ्यांनी अचानक छापेमारी करत लाखो रुपयांचा संशयित माल जप्त केला असून प्रयोगशाळा तपासणीनंतर दोषींवर कठोर कारवाई होणार असल्याची माहिती प्रशासनाने दिली आहे. जिल्ह्यातील अनेक दूध डेअरी, मिठाई दुकाने आणि खवा विक्रेत्यांवर प्रशासनाची विशेष नजर ठेवण्यात येत आहे.

जनतेच्या जीवाशी खेळणाऱ्यांना माफी नाही, असा स्पष्ट इशारा प्रशासनाने दिला असून ग्राहकांनी नोंदणीकृत दुकानातूनच खरेदी करावी, पक्के बिल घ्यावे आणि संशयास्पद पदार्थ दिसल्यास तात्काळ तक्रार करावी, असे आवाहन करण्यात आले आहे.

धाराशिव जिल्ह्यात आता भेसळमुक्त अन्न अभियान अधिक तीव्र होणार असल्याचे संकेत मिळत असून येत्या काळात आणखी मोठ्या धडक कारवाया होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

# अभिजात दर्जाबरोबरच व्यवहारातही मराठीचा वापर वाढला पाहिजे : आमदार कैलास पाटील



धाराशिव (शेख अंजुम)- मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळणे ही अभिमानाची बाब असली, तरी केवळ दर्जा मिळाल्याने मराठीचे संवर्धन होणार नाही. बँका, न्यायालये आणि सरकारी कार्यालयांमध्ये मराठीतून कामकाज होणे आवश्यक असून दैनंदिन व्यवहारात मराठीचा वापर वाढला पाहिजे, असे प्रतिपादन आमदार कैलास पाटील यांनी केले.

३२ व्या अखिल भारतीय नवोदित मराठी साहित्य संमेलनाच्या समारोपप्रसंगी स्वागताध्यक्ष म्हणून ते बोलत होते. यावेळी संमेलनाध्यक्ष डॉ. नंदकुमार राऊत, अखिल भारतीय मराठी साहित्य परिषदेचे राष्ट्रीय अध्यक्ष डॉ. शरद गोरे यांच्यासह विविध राज्यांतून आलेले साहित्यिक, कवी, लेखक आणि मान्यवर उपस्थित होते.

आमदार पाटील यांनी सांगितले की, गेली अनेक वर्षे नवोदित साहित्यिकांना व्यासपीठ उपलब्ध करून देण्याचे महत्त्वपूर्ण कार्य साहित्य परिषद करत आहे. यामुळे अनेक नवोदित कवी-लेखकांना स्वतःची प्रतिभा सादर करण्याची संधी मिळाली आहे. महाराष्ट्रासह कर्नाटक, तेलंगणा, केरळ, दिल्ली आदी सहा राज्यांतील मराठीप्रेमी साहित्यिकांनी संमेलनात सहभाग घेतल्याने धाराशिवकरांना दोन दिवस समृद्ध साहित्यिक मेजवानी लाभली.

प्रा. भास्कर चंदनशिव यांना मरणोत्तर जीवनगौरव पुरस्कार प्रदान करण्यात आल्याचा उल्लेख करताना त्यांनी त्याला संमेलनाचे महत्त्वपूर्ण फलित असल्याचे सांगितले.

मराठी भाषेच्या जतन-संवर्धनासाठी सर्वांनी पुढाकार घेण्याचे आवाहन करताना त्यांनी बँकांचे फॉर्म, न्यायालयीन आदेश आणि शासकीय पत्रव्यवहार मराठीत उपलब्ध व्हावेत, अशी मागणी केली. तसेच बेळगाव, कारवार आणि निपाणी येथील मराठी भाषिकांच्या प्रश्नांबाबत महाराष्ट्राने राजकारणापलीकडे जाऊन एकसंघ भूमिका घ्यावी, असेही ते म्हणाले.

साहित्यिकांना आवश्यक ते सहकार्य करण्याची ग्वाही देत त्यांनी संमेलनाच्या यशस्वी आयोजनाबद्दल डॉ. शरद गोरे व त्यांच्या सहकाऱ्यांचे अभिनंदन केले. संमेलनादरम्यान झालेल्या गैरसोयीबद्दल दिलगिरी व्यक्त करून उपस्थित साहित्यिक, कवी आणि रसिकांचे त्यांनी आभार मानले.

# ज्ञानमंदिरे की मृत्यूचे सापळे? धाराशिव जिल्ह्यातील शंभरहून अधिक जिल्हा परिषद शाळांची दैना; विद्यार्थ्यांच्या जीवाशी सुरू आहे खेळ!

धाराशिव (रामेश्वर डोंगरे )जिल्ह्यातील अनेक जिल्हा परिषद प्राथमिक शाळांची अवस्था आज अत्यंत चिंताजनक बनली असून, शिक्षणाच्या मंदिरांमध्ये विद्यार्थ्यांचे जीव धोक्यात घालून शिक्षण सुरू असल्याचे भयावह वास्तव समोर आले आहे. जिल्ह्यातील शंभरहून अधिक शाळांच्या इमारती जीर्ण झालेल्या असून, अनेक ठिकाणी भिंतींना मोठमोठे तडे गेले आहेत, तर छतांमधून पावसाचे पाणी थेट वर्गखोल्यांमध्ये झिरपत आहे.

पावसाळ्याच्या तोंडावर शाळांची ही दयनीय परिस्थिती पाहून पालकांमध्ये तीव्र संताप व्यक्त होत आहे. विद्यार्थ्यांनी अभ्यास करावा की जीव वाचवावा, असा प्रश्न निर्माण झाला आहे. काही शाळांमध्ये वर्गखोल्यांच्या भिंती धोकादायक अवस्थेत असून, केव्हाही मोठी दुर्घटना घडण्याची भीती व्यक्त केली जात आहे.

शिक्षणाचा दर्जा उंचावण्याच्या मोठमोठ्या घोषणा करणाऱ्या प्रशासनाने मात्र या गंभीर प्रश्नाकडे डोळेझाक केल्याचा आरोप पालक व ग्रामस्थांकडून केला जात आहे. कोट्यवधी रुपयांच्या योजना राबवल्या जात असताना विद्यार्थ्यांना सुरक्षित वर्गखोल्या उपलब्ध करून देण्यात प्रशासन अपयशी ठरत असल्याचे चित्र दिसत आहे.

ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांच्या भविष्याशी संबंधित हा अत्यंत गंभीर विषय असून, जिल्हा परिषद प्रशासनाने तातडीने सर्व जीर्ण शाळांचे सर्वेक्षण करून दुरुस्ती व देखभाल कामे हाती घ्यावीत, अशी मागणी जोर धरत आहे. अन्यथा एखादी दुर्घटना घडल्यास त्याची संपूर्ण जबाबदारी प्रशासनावर राहील, असा इशाराही पालकांनी दिला आहे.


लातूर समाचार धाराशिव

बातम्या,लेख व जाहिराती साठी संपर्क

9422472502
9175325708
9284321472


## धाराशिव शहरातील कांही महत्वाचे फोन नंबर

१) रुग्णवाहिका २२३९७६
२) रक्तपेढी २२३९७६
३) जिल्हा रुग्णालय २२६९२७
४) शहरपोलिस स्टेशन२४०९९९
५) अग्नीशामक विभाग २२२१०१
६) रेल्वेस्टेशन २४०९९९
७) एसपी कार्यालय २२७६२०
८) जिल्हाधिकारी का.२२४५०१
९) तहसिल का. २२७८८२
१०) जि.प. २२५४०७
११)नगरपरिषद २२५४०७
१२)जिल्हा माहिती अधिकारी ०२४७२-२२२७४४
१३) जिल्हा उद्योग केंद्र (डीआयसी) ०२४७२-२२२२२६
१४) उस्मानाबाद जिल्ह्याचे उपसंचालक ०२४७२-२२७८ ९ २
१५) उप विभागीय वन कार्यालय, उस्मानाबाद ०२४७२-२२३४०८
१६)अधीक्षक उत्पादन शुल्क कार्यालय ०२४७२-२२३३८७
१७) जिल्हा कल्याण अधिकारी ०२४७२-२२२०१४
१८) प्रादेशिक परिवहन अधिकारी (आरटीओ) ०२४७२-२२२५५५
१९) मुख्य पोस्ट ऑफिस ०२४७२-२२२२९४
२०) जिल्हा रोजगार अधिकारी ०२४७२-२२२२३६
२१) विभागीय नियंत्रक (एमएसआरटीसीसी) ०२४७२-२२२२१६
२२) लातूर समाचार ९४२२४७२५०२
बीडीओ, एम.आर.ए.जी.एस. जिल्हा परिषद ०२४७२-२२०६११
२३)मुख्य कार्यकारी अधिकारी ०२४७२-२२६८४०
२४) २४) अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी ०२४७२-२५) २२३३९७ प्रकल्प संचालक ०२४७१-२२१५५२
२५) उपमुख्य कार्यकारी अधिकारी (सामान्य प्रशासन) ०२४७२-२२३३८८
२६) उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्राम पंचायत) ०२४७२-२२३३४३
२७) उप मुख्य कार्यकारी अधिकारी (स्त्री व मुल) ०२४७२-२२२५७०
२८) मुख्य खाते व वित्त अधिकारी ०२४७२-२२२१३२
२९) शिक्षण अधिकारी (प्राथमिक) ०२४७२-२२४१८४
३०) शिक्षण अधिकारी (माध्यमिक) ०२४७२-२२४१८४

## कायद्याची संक्षिप्त माहितीसाठी आयोजित कार्यशाळेस प्रतिसाद

# अनुसूचित जाती जमातीवर अन्याय, अत्याचार होणारच नाहीत यासाठी सामूहिक प्रयत्नाची गरज- प्रा. ॲड. मंजुषा साखरे



धाराशिव (जिमाका)- जिल्ह्यात सामाजिक जातीय सलोखा राखण्यासाठी प्रयत्न करण्यात येत आहेत. मात्र, वेगवेगळ्या कारणावरुन अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमाती या समुहातील काही व्यक्तींवर अन्याय होत असल्याचे दिसून येत आहे.त्यामुळे त्यांच्यावर अन्याय,अत्याचारच होणारच नाहीत यासाठी सामूहिक प्रयत्न करणे आवश्यक आहे. असे प्रतिपादन डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ उपपरीसर केंद्राच्या प्रा.ॲड.मंजुषा साखरे यांनी केले.

दि. २९ मे रोजी धाराशिव येथील प्रशासकीय इमारतीमधील सामाजिक न्याय भवनातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर सांस्कृतिक सभागृहात आयोजित करण्यात आलेल्या अनुसूचित जाती,अनुसूचित जमाती (अत्याचार प्रतिबंध) अधिनियम,१९८९ सुधारित अधिनियम २०१५ व सुधारित नियम २०१५ आणि इतर कायद्याची संक्षिप्त माहिती देण्यासाठी आयोजित नागरी मार्गदर्शन कार्यशाळेत प्रा. ॲड. श्रीमती. साखरे बोलत होत्या. धाराशिव पंचायत समितीचे गट विकास अधिकारी संजय कांबळे,छत्रपती संभाजीनगर विभागाच्या नागरी हक्क संरक्षण पोलीस अधीक्षक डॉ.अनिता जमादार, प्रभारी पोलीस उपअधीक्षक पी. बी. सोनवणे, समाज कल्याणचे सहाय्यक आयुक्त सचिन कवले,महिला व बालविकास कार्यालयाच्या केंद्र प्रशासक प्रियंका जाधव आणि महिला व बालकल्याण विभागाच्या सामाजिक कार्यकर्त्या प्रज्ञा बनसोडे आदींची यावेळी प्रमुख उपस्थिती होती.

पुढे बोलताना प्रा.ॲड.श्रीमती. साखरे म्हणाल्या की, स्वातंत्र्यापूर्वी अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती या समूहावर अन्याय अत्याचार होत होते,असाच प्रकार स्वातंत्र्यानंतर ही सुरू होता.त्याला आळा बसविण्यासाठी डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी संविधानामध्ये नागरिक संरक्षण कायद्याची तरतूद केली. मात्र,अन्याय अत्याचार होत असल्यामुळे १९८९ ला अनुसूचित जाती,अनुसूचित जमाती अत्याचार प्रतिबंध कायदा आणला. त्यानंतर २०१५ भारतीय न्याय संहिता हा कायदा आणला गेला.त्याची अंमलबजावणी होऊ लागल्यामुळे अनुसूचित जाती व जमातीवरील अत्याचाराचे प्रमाण कमी होण्यास मदत झाल्याचे त्यांनी सांगितले.

मुळात यांच्यावर अन्याय केले जाऊ नयेत यासाठी मानसिकता बदलणे गरजेचे असल्याचे त्यांनी आवर्जून नमूद केले. विशेष म्हणजे एस.सी., एस.टी. महिलांवर आर्थिक व मानसिक छळ या प्रकारचा अन्याय अत्याचार झाला तर तो ॲट्रॉसिटी अंतर्गत गुन्हा दाखल करण्यासह आरोपीस तात्काळ अटक करणे हे पोलिसांचे प्रथम कर्तव्य असल्याचे ॲड.श्रीमती.साखरे यांनी सांगितले.त्या पुढे म्हणाल्या की,या केसेस विशेष न्यायालयाअंतर्गत चालवून त्याचा न्याय-निवडा लवकरात लवकर करणे आवश्यक असल्याचे त्यांनी नमूद केले.तसेच पोलिसांनी या कायद्याची प्रभावीपणे अंमलबजावणी केली तर अत्याचार करणाऱ्यांना आपोआप जरब बसून भीती निर्माण होते. जर कायद्याची भीती निर्माण झाली तर कोणावरही अन्याय होणार नाही.त्यामुळे अत्याचाराला आळा घालायचा असेल तर माणूस म्हणून जगणे आवश्यक असल्याचे प्रा. ॲड. साखरे यांनी सांगितले.

महिला व बाल विकास विभागांतर्गत वन स्टॉप केंद्राच्या प्रियंका जाधव म्हणाल्या की, पुरोगामी महाराष्ट्रात महिला होणारी दिवसाच्या आर्थिक गंभीर बाब असून महिला व मुली सुरक्षित नसल्याचे त्यांनी सांगितले.महिलांना आजही दुय्यम स्थान असून त्यांना निर्णय घेण्याचा अधिकार नसल्याचे त्यांनी आवर्जून नमूद केल तर पुरुषप्रधान संस्कृती असल्यामुळे मालमत्ता देखील त्यांच्या नावावर नसल्याची खंत व्यक्ती केली.मात्र प्रत्येक क्षेत्रात पुरुषांच्या खांद्याला खांदा लावून महिला आज काम करत असल्याचे त्यांनी सांगितले. हुंडाबळी आणि कौटुंबिक हिंसाचाराच्या घटना घडत असून गर्भाशयापासून स्त्रियांवर अन्याय होत असल्याचे त्यांनी नमूद केले.स्त्रीचे अपहरण आणि छेडछाड आधी प्रकार रोखण्यासाठी स्त्रियांनीच स्वतःच्या सुरक्षेसाठी सजग बनायला पाहिजे असे आवाहन त्यांनी केले. सोशल मीडियावर बऱ्याच महिलांना अवमानास सामोरे जावे लागत असून ते प्रमाण मोठे असल्याचे त्यांनी नमूद केले. महिलांनी शिक्षण घेऊन शासकीय योजनांचा लाभ घेऊन आर्थिक व सामाजिकदृष्ट्या सक्षम बनावे.त्यासाठी पुरुषांनी स्त्रियांच्या पाठीमागे खंबीर उभारावे,असे आवाहन करत त्या म्हणाल्या की, स्त्रियांच्या संरक्षणासाठी वेगवेगळे कायदे आहेत, त्याचा आधार घ्यावा. तसेच कायद्याची माहिती जाणून घेऊन होणाऱ्या अत्याचाराला प्रतिबंध करावा,असे श्रीमती. जाधव यांनी सांगितले.

प्रज्ञा बनसोडे यांनी जिल्ह्यात बालविवाहाचे प्रमाण वाढले असून ही गंभीर बाब आहे. अक्षय तृतीयापासून आजपर्यंत ३२ विवाह प्रशासनाच्या माध्यमातून रोखण्यात आल्याचे त्यांनी सांगितले. बालविवाह कोणत्याही जातीत होऊ नयेत यासाठी सामूहिक प्रयत्न करणे प्रत्येकाची जबाबदारी आहे. बाल वयातच मातृत्व लादले जात असल्यामुळे विवाहानंतरचे दुष्परिणाम कोणी रोखू शकत नाही. जिल्हा प्रशासनाच्या माध्यमातून बालविवाह रोखण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न केले जात असल्याचे त्यांनी सांगितले. तसेच गावस्तरीय बालविवाह ग्राम दक्षता समितीने होणारे बालविवाह रोखण्यासाठी पुढाकार घेतला पाहिजे. त्याबरोबरच इतर नागरिकांनी देखील जर अशा पद्धतीचा विवाह होत असेल तर १०९८ या हेल्पलाईन नंबरवरती संपर्क करावा,असे आवाहन श्रीमती. बनसोडे यांनी केले. यावेळी राजाभाऊ ओहाळ, सामाजिक कार्यकर्ते बजरंग ताटे, रामभाऊ लगडे, मारुती बनसोडे, सुनील काळे व अजिनाथ राऊत यांनी आपले मनोगत व्यक्त केले. प्रारंभी दीपप्रज्वलन करून महापुरुषांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करीत अभिवादन करण्यात आले. प्रास्ताविक समाज कल्याण विभागाचे सहाय्यक आयुक्त सचिन कवले यांनी तर सूत्रसंचालन पीसीआर विभागाचे हेडकॉन्स्टेबल मधुकर शेवाळे यांनी केले.उपस्थितांचे आभार बार्टीचे प्रकल्प संचालक तुषार कदम यांनी मानले.या कार्यशाळेस जिल्ह्यातील महिला व पुरुष मोठ्या संख्येने उपस्थित होते.

सांज दैनिक लातूर समाचार हे मुद्रक,प्रकाशक,संपादक व मालक दयानंद शंकर जडे, यांनी जडे ऑफसेट प्रिंटर्स, मित्रनगर, लातूर येथे छापून समर्थनगर धाराशिव येथे प्रकाशित केले आहे.

Evening Daily Latur Samachar is Published by Dayanand Shankar Jade from Samarth Nagar,Dharashiv on behalf of Dayanand Shankar Jade ,edited by Dayanand Shankar Jade and Printed by Dayanand Shankar Jade at Jade Offset Printers,Mitra Nagar,Latur. Editor : Dayanand Shankar Jade Mob:9422472502 RNI- MAHMAR/2003/11649